# लष्कराचे वाहन दरीत कोसळले; पाच जवानांचा मृत्यू



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात मंगळवारी (दि.२४) सायंकाळी मोठा अपघात घडला आहे. जिल्ह्यातील मेंढर भागात लष्कराचे वाहन रस्ता चुकून दरीत कोसळले. या घटनेत अनेक जवान जखमी झाले. माहिती मिळताच लष्कराचे अधिकारी घटनास्थळी पोहचले अन् जखमी जवानांना रुग्णालयात दाखल केले, पण उपचारादरम्यान पाच जवानांची प्राणज्योत मालवली. मिळालेल्या माहितीनुसार, या वाहनात ८ ते १० जवान होते, त्यापैकी पाच जणांचा मृत्यू झाला असून, उर्वरित जखमी जवानांवर उपचार सुरू आहेत. ११ एमएलआयच्या लष्करी वाहनाचा घोरा पोस्टजवळ अपघात झाला. वाहन सुमारे ३००-३५० फूट खोल दरीत कोसळले. माहिती मिळताच ११ एमएलआयची क्विक रिस्पॉन्स टीम (क्यूआरटी) घटनास्थळी पोहचली आणि बचावकार्य सुरू केले.

रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १५९

www.ramprahar.com

बुधवार, २५ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

खंडाळा घाट क्षेत्रात वाहतूक कोंडी, सुट्ट्यांचा परिणाम/२

पनवेल 'आरटीओ'तील लिपिक लाच घेताना जाळ्यात/३

अंडर १९ वर्ल्डकपसाठी भारतीय संघ जाहीर/८

# 'लाडक्या बहिणीं'च्या खात्यात राज्य सरकारकडून १५०० रुपये जमा

**मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम पुन्हा जमा होण्यास मंगळवार (दि.२४)पासून सुरुवात झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या योजनेतील निधी आचारसंहितेमुळे अडकला होता, परंतु आता नव्याने स्थापन झालेल्या सरकारने पुन्हा एकदा ही योजना कार्यान्वित केली असून पात्र महिलांच्या खात्यावर दीड हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

१२ लाख ८७ हजार बहिणींच्या खात्यात या योजनेंतर्गत दिला जाणारा सन्मान निधी मंगळवारी जमा करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत उर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात सन्मान निधी जमा केला जाणार आहे, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. तसेच आधार प्रमाणिकरण होत नसल्याने अनेक महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या होत्या. पण आता ज्या महिलांचे आधार प्रमाणीकरण झाले, त्यांनाही लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेतील सन्माननिधी वाढवण्याची तरतूद त्यांच्या वचननाम्यात दिली होती, परंतु सध्या प्राप्त झालेल्या हप्त्यानुसार महिलांना केवळ १५०० रुपये मिळत आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या आधी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे महिलांना २१०० रुपये कधी मिळणार असा



प्रश्न उपस्थित होत आहे. यावर आदिती तटकरे म्हणाल्या, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या पत्रकार परिषदेत सरकारची योजना सांगितली होती. पुढच्या वर्षी अर्थसंकल्प मांडण्यात येईल. तेव्हा सकारात्मक पद्धतीने विचार केला जाईल. सध्या आचारसंहितेच्या कालावधीत स्थगित केलेल्या निधी वितरणाची सुरुवात करण्यात आली आहे, असे आदिती तटकरे यांनी दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

विविध तांत्रिक अडचणींमुळे काही महिलांना अर्ज करता आलेला नाही. त्यामुळे नव्याने नोंदणी केव्हा सुरु होणार असा प्रश्न महिलांकडून विचारला जातोय. त्यावर आदिती तटकरे म्हणाल्या, नोंदणी करण्याची शेवटची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत होती. तोपर्यंत अडीच कोटींपेक्षा जास्त महिलांची नोंदणी झाली आहे. अद्याप पुन्हा नोंदणी सुरू करण्यासंदर्भात चर्चा झालेली नाही. पात्र महिलांपर्यंत सध्या आम्ही सन्माननिधी पोहचवण्याचा प्रयत्न करत आहोत. दरम्यान, या योजनेसाठी निकष बदलण्यात येणार असल्याची चर्चा होती. त्यामुळे अनेक लाभार्थी महिला या योजनेतून अपात्र ठरतील अशी शक्यता वर्तवण्यात आली. पात्र महिलांच्या अर्जांची पुन्हा छाननी होणार का? यावर आदिती तटकरे म्हणाल्या, यासंदर्भातील भूमिका मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली आहे. याबाबतची पुनर्पडताळणी करण्यात येईल. तक्रारी आल्या असतील तर योग्यपद्धतीने तपासून घेतल्या जातील. सरसकट पुनर्पडताळणीचा निर्णय घेण्यात आलेला नाही. निकषही बदलले नाहीत.

# महाराष्ट्रात दुसऱ्या हरित क्रांतीची सुरुवात -मुख्यमंत्री

## दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०च्या अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मंगळवारी (दि.२४) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

या वेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण



विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर - सिंह, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत काम सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर चालविण्यात येतील.

### अनुदान, सबसिडीचा बोजा होणार कमी

या योजनेत राज्यभरात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून विकेंद्रीत स्वरुपात कृषी फीडर्सना विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल तसेच या योजनेत किफायतशीर दरात वीज मिळाल्यामुळे राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल.

या कार्यक्रमाला उंबर्डा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतील पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत राज्यात नोव्हेंबर अखेर १५,७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. यामधून १,३०,४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री अशा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी अनेक दशकांची मागणी आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# आजपासून रायगड केंद्राची प्राथमिक फेरी

### मुंबई, ठाणे, कल्याण व इतर केंद्राची प्राथमिक फेरी २६ ते २९ डिसेंबरपर्यंत होणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा ११वे वर्ष असून त्या अंतर्गत रायगड केंद्राची प्राथमिक फेरी २५ डिसेंबर रोजी, तसेच मुंबई, ठाणे, कल्याण व इतर केंद्राची प्राथमिक फेरी २६ ते २९ डिसेंबरपर्यंत होणार आहे. या प्राथिमक फेरी खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात होणार आहे.





या स्पर्धेची प्राथमिक फेरी राज्यातील विविध केंद्रांवर होऊन अंतिम फेरी १० ते १२ जानेवारीदरम्यान पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. त्या अनुषंगाने या स्पर्धेच्या पुणे, जळगाव व कोल्हापूर केंद्राची प्राथमिक फेरी नुकताच यशस्वीरीत्या झाली.

नाट्य चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. **(पान २ वर..)**

## निवडक

### भारत-पाकिस्तान क्रिकेट संघ २३ फेब्रुवारीला आमनेसामने

**नवी दिल्ली :** आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चे वेळापत्रक जाहीर केले आहे. पहिला सामना न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यात कराची येथे होणार आहे. बहुप्रतिक्षित भारत-पाकिस्तान सामना २३ फेब्रुवारीला दुबईत होणार आहे. स्पर्धेला १९ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. फायनल ९ मार्च होईल.

### राज्यात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्यात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांची बदली दिव्यांग विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी करण्यात आली. हर्षदीप कांबळेंची बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी बदली केली. मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव राधाकृष्णन यांची महाजेनकोच्या अध्यक्षपदी बदली झालीये.

# लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात स्नेहसंमेलन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये सोमवारी (दि.२३) वार्षिक स्नेहसंमेलन झाले. नेहमीच नाविन्याचा ध्यास घेणाऱ्या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही लक्षित चले लक्ष्य की ओर... ही संकल्पना घेऊन स्नेहसंमेलन सादर केले गेले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

विद्यार्थ्यांच्या विकासात सातत्य राखणाऱ्या या विद्यालयात यंदाच्याही स्नेहसंमेलनात विविध श्रवणीय व नयनरम्य नृत्याविष्कार सादर झाले. नृत्यांच्या ठेक्यावर सर्वच उपस्थित पालक गण व इतर श्रोते यांनीही ताल धरला. या कार्यक्रमात संपूर्ण वर्षभरात विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा पारितोषिक वितरण सोहळा झाला.

प्रास्ताविकात विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली संजय म्हात्रे यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांची तसेच विद्यालयाच्या चढत्या आलेखाची माहिती दिली. यावर्षी विद्यालयाला रयत शिक्षण संस्थेतर्फे दिल्या गेलेल्या उपक्रमशील शाळा, या पुरस्काराची ही त्यांनी माहिती दिली. कला, क्रीडा, सांस्कृतिक, संगीत अशा सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतल्याचे त्यांनी आपल्या प्रास्ताविकाच्या भाषणातून सांगितले.

विद्यालयाच्या प्रगतीला सर्वांनीच हातभार लावून विद्यालयाचे नाव अधिकच उज्वल करावे, असे मत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मांडले तसेच विद्यार्थ्यांची प्रगती अशीच उत्तरोत्तर वाढावी यासाठी शुभेच्छा देत विद्यार्थ्यांचे कौतुक विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. **(पान २ वर..)**

# तब्बल ३३ वर्षांपासून फरार असलेला खुनी पती गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीला जिवंत जाळून फरार झालेला आरोपीचा तब्बल ३३ वर्षांनंतर छडा लागला आहे. कौटुंबिक कारणावरून झालेल्या भांडणात पत्नीच्या अंगावर रॉकेल ओतुन तिला जिवंत जाळून फरार झालेल्या पतीला पनवेल शहर पोलिसांनी ३३ वर्षानंतर अटक केली आहे. बाबु गुडगीराम काळे (वय ७०) असे या आरोपी पतीचे नाव आहे.

आरोपीने १९९१मध्ये पनवेलमध्ये असताना पत्नीला जिवंत जाळून पलायन केले होते. तेव्हापासून फरार असलेला हा आरोपी ३३ वर्षे पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी परभणी येथून त्याला ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत. न्यायालयाने त्याची ३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

या प्रकरणातील आरोपी बाबु काळे हा १९९१ मध्ये पत्नीसह पनवेलमध्ये राहण्यास होता. या भांडणादरम्यान आरोपी बाबु काळे याने पत्नीवर रॉकेल टाकून तिला जाळले होते. पत्नीला सायन हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यावेळी बाबूच्या पत्नीने दिलेल्या जबाबावरून पनवेल शहर पोलिसांनी बाबुविरोधात गुन्हा दाखल केला होता. उपचारादरम्यान बाबुच्या पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर बाबु काळे हा फरार झाला होता. त्यानंतर पोलिसांनी बाबुविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता.

# राज्यात दोन दिवस पावसाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील विविध भागांमध्ये काही प्रमाणात आभाळी हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील तुरळक भाग; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे), आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या भागातील शेतकऱ्यांनी कृषी सल्ला आणि हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.







# करचोरी, करगळती रोखण्याच्या कामात हयगय नको -उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई : प्रतिनिधी**



करसंकलन आणि महसुलवाढीच्या प्रक्रियेत सुसुत्रता, सुधारणा आणत परिणामकेंद्रित काम करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'वित्त व नियोजन'सह 'राज्य उत्पादन शुल्क' या दोन्ही विभागांची मंगळवारी घेतलेल्या आढावा बैठकीत दिले. अधिकाऱ्यांनी पारदर्शकतेवर भर देऊन करचोरी, करगळती रोखण्याच्या कामात हयगय करू नये,असे या वेळी सांगितले.

या वेळी वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. अशिष जयस्वाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव शैलजा ए., लेखा व कोषागारे विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपसचिव रविंद्र औटे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सह आयुक्त विश्वनाथ इंदिसे, सहआयुक्त सुनिल चव्हाण, अपर आयुक्त यतीन सावंत, उपायुक्त सुभाष बोडखे, उपायुक्त शंकर जगताप आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीदरम्यान प्रलंबित योजना, आवश्यक निधी, राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला. राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांसारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. श्री. पवार यांनी या वेळी शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या.

# खंडाळा घाट क्षेत्रात वाहतूक कोंडी, अन्य महामार्गावरही मोठी गर्दी; सुट्यांचा परिणाम

**खोपोली : प्रतिनिधी**



नाताळ उत्सवामुळे सुट्या पडल्या आहेत. त्यामुळे हिवाळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी मोठ्या संख्येत नागरिक घराबाहेर पडत आहेत त्यातच शाळांच्या सहली यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर वाहनांची गर्दी वाढल्याने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे.

वाहनांची मोठी भर पडून खालापूर टोल नाका, खंडाळा घाट ते खंडाळा प्रवेश या अंतरात वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या आहेत. दरम्यान अवजड वाहने ही ट्रक टर्मिनल्स मध्ये न थांबता एक्स्प्रेस वे वर आल्याने वाहतूक कोंडीत अधिक भर पडली होती, मात्र आयआरबी डेल्टा फोर्स व महामार्ग वाहतूक पोलीसांनी तत्काळ उपाययोजना करून काही अंशी कोंडी फोडून वाहतूक सामान्य केली.

द्रुतगती मार्गासह मुंबई-पुणे जुना महामार्ग, खोपोली शीळफाटा इंदिरा गांधी चौक ते मुळगांव कॉर्नर, खोपोली भाजीपाला मार्केट ते वरची खोपोली कॉर्नर, खोपोली पेण रस्त्यावर शीळफाटा ते देवन्हावे फाटा, पाली फाटा अशा सर्व ठिकाणी जबरदस्त वाहतूक कोंडीचा सामना बाहेरून आलेल्या व त्यासोबत स्थानिकांना करावा लागला.

तालुक्यातील खोपोली-पेण व पाली मार्गे विविध वॉटर पार्क, पर्यटनस्थळे व समुद्र किनाऱ्यांवर जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. वाढलेल्या वाहनांमुळे रस्त्यांवर दोन दिवसांपासून प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत होती. एक्सप्रेस वे व इतर सर्व प्रमुख रस्त्यांवर पुढील तीन चार दिवस अशीच वाहनांची गर्दी राहणार असून, वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलीस, आयआरबी यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय ग्रुपचे सदस्य सतत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कार्यरत आहेत.

खंडाळा घाट अंतरात वाहतूक कोंडीमुळे वाहनांचे ब्रेक, क्लज प्लेट निकामी होऊन अपघात होण्याच्या घटना ही वाढल्या असल्याने, यंत्रणेवर यासर्वांचा मोठा ताण वाढल्याचे दिसले. खालापूर टोल नाक्यावर वाहनांना थांबवून टप्याटप्याने वाहने घाट क्षेत्रात सोडण्याचा उपाय करण्यात आला.

**चार चाकी वाहने व अन्य जड वाहने खंडाळ्यातून उतरणाऱ्या बाजूस विरुद्ध बाजूने नेण्यात येतात त्यामुळे अंडा पॉइंट जवळ कोंडी निर्माण होते. अशा स्थितीत अपघात होण्याची शक्यता निर्माण होते. वाहन चालक नियमांचे पालन करीत नाहीत. चार पाच लेन लागतात व कोंडी वाढते.**

**-गुरुनाथ साठेलकर**
**समन्वयक, अपघात**
**ग्रस्त मदत ग्रुप, खोपोली**

मात्र अनेक वाहने जुन्या मार्गाने घाटात दाखल होत असल्याने खंडाळा घाटात वाहतूक कोंडीची समस्या पुढील दोन तीन दिवस कायम राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पनवेलमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतर्फे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे दिव्यांग दिन सोहळा मोठ्या उत्साहात घेण्यात आला. या वेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे दिव्यांग विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, नायब तहसीलदार विनोद लचके, सिडकोच्या अधिकारी सोनल पाखोडे महापालिका कार्यक्षेत्रातील विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पनवेल महापालिकेच्यावतीने दिव्यांग बांधवांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. महापालिकेच्या वतीने सिडकोच्या अधिकारी सोनल पाखोडे यांनी दिव्यांग बांधवांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षणाबाबत माहिती दिली. तसेच नायब तहसीलदार विनोद लचके यांनी तहसिल कार्यालयाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना देण्यात येणाऱ्या संजय गांधी योजनेची माहिती दिली.

## श्याम बेनेगल यांना श्रद्धांजली

**मुंबई :** ज्येष्ठ चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक पद्मभूषण श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे.

देशातील निवडक चित्रपट निर्मात्यांच्या यादीत श्री श्याम बेनेगल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. समांतर चित्रपटातील आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाद्वारे त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर आपली अमिट छाप सोडली.

अंकुर, निशांत आणि मंथन यांसारख्या उत्कृष्ट कलाकृतींच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक वास्तवाचे चित्रण मांडण्याचे धैर्य दाखवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रतिभावंत कलाकार जगासमोर आले. 'भारत एक खोज' या ऐतिहासिक दूरदर्शन मालिकेच्या माध्यमातून त्यांनी लाखो प्रेक्षकांना भारताच्या गौरवशाली इतिहासाची नव्याने ओळख करून दिली.

त्यांच्या निधनामुळे अनेक चित्रपट निर्मात्यांना प्रेरणादायक असणारा एक प्रतिभावंत निर्माता, दिग्दर्शक गमावला आहे. मी दिवंगत श्री श्याम बेनेगल यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांना आणि चाहत्यांना आपल्या शोक संवेदना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.



ना. आदिती तटकरे यांची कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्यानंतर पहिल्यांदाच पेण तालुक्यात आल्यानंतर त्यांचे कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले. यावेळी पेणचे आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्षा प्रितम पाटील, जिल्हा परिषद सदस्या कौशल्या पाटील, गटनेते अनिरुध्द पाटील यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते महायुतीतील घटकपक्षांनीही ना.अदिती तटकरे यांचा सत्कार केला.

## नशेमध्ये तरुण चढला हाय-टेंशन टॉवरवर

**पनवेल : वार्ताहर**

शोले चित्रपटात धर्मेंद्र म्हणजेच वीरू बसंतीसाठी दारूच्या नशेत उंच पाण्याच्या टाकीवर चढतो तसाच काहीसा प्रसंग खारघर येथे घडला असून तरुण दारुच्या नशेत महावितरणाच्या हाय-टेंन्शन टॉवरवर चढला.

खारघर येथील सेक्टर ३ मध्ये अज्ञात तरुणाने हाय-टेंशन इलेक्ट्रिक टॉवरवर चढून एक तासांचा हाय व्होल्टेज ड्रामा केला. सदर तरुण दारूच्या नशेत होता. पोलीस, अग्निशमन दल आणि वाहतूक पोलीसांच्या जवळपास एक तासांच्या प्रयत्नानंतर हा तरुण खाली आला. त्यानंतर त्याला पोलीस ठाण्यात नेण्यात आले. बेलपाडा आदिवासीवाडीत हाय टेंशन टॉवर आहे. या टॉवरवर तरुण चढल्याचे पाहताच आजूबाजूच्या लोकांनी गर्दी केली. सदर घटनेची माहिती पोलीस व वाहतूक पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी येवून सदर तरुणाला खाली उतरण्याची विनंती करीत होते

# दुबईतील मराठी उद्योजकांना केंद्र सरकारचा पाठिंबा -ना.आठवले

**मुंबई : प्रतिनिधी**

दुबई आणि सर्व संयुक्त अरब अमीरातीमध्ये उद्योग क्षेत्रात मराठी माणुस अग्रेसर आहे. सर्व आखाती राष्ट्रा मध्ये अग्रेसर असणाऱया मराठी उद्योजकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारचा पुर्ण पाठिंबा आहे. दुबईत मराठी माणुस उद्योगात मराष्ट्राचा नावलौकिक वाढवत असल्याबद्दल आम्हाला अभिमान आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाने राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

दुबईतील गल्फ महाराष्ट्र बिजनेस फोरम च्या वतीने आयोजित कार्यक्रमात ना.रामदास आठवले बोलत होते. जी एम बी एफ ग्लोबल च्या वतीने ना.रामदास आठवले यांचा दुबईतील मराठी उद्योजकांशी संवाद आणि सत्कार आयोजित करण्यात आला होता. जी.एम बी एफ च्या या संमेलनात ना.रामदास आठवले यांनी दुबईत उद्योग करणाऱ्या मराठी माणसाचे आम्हाला अभिमान असल्याचे गौरव उद्गार काढले.

पान १ वरुन

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा आजपासून रायगड केंद्राची प्राथमिक फेरी

नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. अंतिम फेरीतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात स्नेहसंमेलन



या कार्यक्रमासोबतच विद्यालयाच्या संगीत विभागातर्फे विद्यार्थ्यांनी विविध गीते सादर केले ज्याला सर्वांनीच मनसोक्त दाद दिली. विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनाही पारितोषिके दिली गेली. त्याचबरोबर विभाग वार उत्कृष्ट शिक्षकाचे पुरस्कारही दिले गेले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, रायगड विभागाचे, विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहाय्यक विभागीय अधिकारी विकास जगताप, कमिटी सदस्य राजेश गायकर, भाजप कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, डॉ. अरुणकुमार भगत, आशाताई भगत आणि अविनाश कुलकर्णी तसेच विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुरकर, कुसुम प्रजापती व नेहा खन्ना आदी उपस्थित होते. याबरोबरच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व हजारोंच्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता.

# योजनांचा लाभ घेण्याचे महिलांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या महिला बालकल्याण विभागाच्यावतीने विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी आवाहन केले आहे.

यामध्ये राज्य, राष्ट्रीय स्तर व आंतरराष्ट्रीयवर क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या खेळांसाठी मुलींना (वैयक्तिक व सांघिक) शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येते. या योजनेचा लाभार्थ्यांला एकदाच लाभ घेता येणार आहे. यामध्येआंतरराष्ट्रीय पातळीवर वैयक्तिक स्तरावरती सुवर्ण पदक विजेत्या खेळाडू मुलींना ५ लक्ष, रौप्य विजेत्यांना तीन लक्ष, ब्रांझ पदक विजेत्यांना २ लक्ष, राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण पदक विजेत्या खेळाडू मुलींना २ लक्ष, रौप्य पदक विजेत्यांना १.५ लक्ष, ब्रांझ पदक १ लक्ष रक्कम देण्यात येत आहे. राज्य पातळीवर सुवर्ण पदक विजेत्या मुलींना ५० हजार, रौप्य पदक विजेत्यांना ३५ हजार, ब्रांझ विजेत्यांना २५ हजार रक्कम देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधावा.

लाभधारक महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असल्या बाबतचा पुरावा म्हणून (उदा. रेशन कार्ड/निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड, मालमत्ता कर भरल्याची पावती, तीन वर्षांचा भाडेकरारनामा, जन्मदाखला /पासपोर्ट इ.) सादर करावा.

वैयक्तिक किंवा सांघिक लाभ घेणारे खेळाडू पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या शाळेत किंवा महाविद्यालयात शिकणारे असावे. शाळा व महाविद्यालय यांचे संमती पत्र असावे. ही मदत पुढील क्रिडा कामगिरी मध्ये खंड पडू नये अशा यासाठी देण्यात येते. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने लाभ देणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार आयुक्त महोदयांना राहील. आधारकार्डाची व राष्ट्रियकृत बँकेच्या पासबूकची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक राहिल. याबरोबरच महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत वैद्यकिय शिक्षण जसे की एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.. बी.डी.एस. शिक्षण घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती देणेत येते.

# गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली पनवेल पोलीस ठाण्याला भेट

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सोमवारी रात्री अचानकपणे पनवेल शहर पोलीस ठाण्याला सरप्राईज व्हिजिट देवून येथे चालणाऱ्या कामाकाजाची माहिती घेतली तसेच आवश्यक त्या सूचना केल्या.

या वेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी वपोनि नितीन ठाकरे व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्याकडून पोलीस ठाण्यांतर्गत चालणाऱ्यां विविध कामाकाजाची गुन्हे, अटक आरोपी प्रमाण तसेच इतर विभागाची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी मार्गदर्शन करताना आवश्यक त्या सूचना केल्या. त्यामध्ये नार्कोटिक्स बाबत जास्तीत जास्त कारवाई करून शाळा व कॉलेजेस मध्ये कॉन्सन्ट्रेट करणे तसेच माल कुठून आणला त्याचे मुळापर्यंत जाणे, सायबर संबंधित गुन्हे ओपन करणे, महिला व बालकांविषयी असलेल्या गुन्ह्यांमध्ये विशेष लक्ष देणे. तसेच त्यांनी महिला लॉकअप बाबत विचारणा केली तसेच रात्रपाळीचे सर्व अंमलदार यांना त्यांच्या राहण्याबाबत विचारपूस करून महिलांचे प्रात्यविधीची व्यवस्था सुस्थितील आहे का, याबाबत चौकशी केली.

आतापर्यंत पनवेल शहर पोलीस ठाण्यामार्फत करण्यात आलेल्या कामाकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून आगामी काळातसुद्धा पनवेल शहर पोलीस स्टेशनकडून चांगली कामगिरी होईल, अशा प्रकारच्या शुभेच्छा त्यांनी दिल्या.



# पनवेलमधील पटेल, कच्छी मोहल्ल्यातील ९०० झोपडपट्टीधारकांना मिळणार घरे

## पंतप्रधान आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी

**पनवेल : वार्ताहर**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने दोन हजार ६०० घरे बांधण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात पटेल मोहल्ला, कच्छी मोहल्ला याठिकाणी इमारती बांधण्यात येणार आहे. दरम्यान, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता.

यासाठी महापालिकेच्या वतीने झोपड्या रिकाम्या करण्यासाठी झोपडीधारकांना या आधी नोटीसा देण्यात आल्या होत्या, मात्र पटेल मोहल्ला, कच्छी मोहल्ला येथील जनहित कल्याणकारी सोसायटीच्या वतीने महापालिकेच्या विरोधात मुंबई येथील मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. उच्च न्यायालयाने झोपडपट्टीधारकाने ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत झोपडी रिक्त करावी असे आदेश दिले होते. खर्या अर्थाने या योजने मुळे पनवेल आता झोपडपट्टी मुक्त



होणार असून लवकरच प्रतुक्ष कामाला सुरवात होणार असून पहिल्या टप्प्यात पटेल मोहल्ला आणि कची मोहलतील ९०० झोपडपट्टीधारकांना स्वतःची घरे मिळणार आहेत.

देशाला स्वातंत्र्य मिळून यावर्षी २०२४ मध्ये ७७ वर्ष पूर्ण होत असून देशातील प्रत्येक कुटुंबाला जलजोडणी, शौचालयाची व्यवस्था, २४ तास वीज व पोहोच रस्ता या सुविधांसह पक्के घर असायला हवे, असे विचारात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाबरोबरीने पनवेल शहर आणि आसपासच्या नागरिकांना महापालिकेच्यावतीने पंतप्रधान आवास योजनेची माहीती देण्यात येते. आवश्यक कागदपत्रांची माहीती देऊन, आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पालिकेच्यावतीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शासन निर्णय ९ डिसेंबर २०१५, नुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी योजनांमध्ये 'सर्वांसाठी घरे २०२२' ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनूसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका हद्दीतील झोपडीधारकांना पक्की घरे बांधून दिली जाणार आहे. या योजनेंतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रातील वाल्मिकी नगर, महाकाली नगर, लक्ष्मी वसाहत, कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला, अशोकबाग, तक्का वसाहत या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत पालिका हद्दीत २ हजार ६०० घरे बांधण्यात येणार आहे.

यामध्ये लाभार्थ्याला ३० चौरस मीटरचे घर मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुर्नवसनाच्या ०६ सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. या योजनेमुळे पनवेल महानगरपालिका झोपडपट्टी मुक्त होण्यास मदत होणार आहे. तसेच झोपडपट्टीधारकास इमारतीमध्ये स्वत:च्या हक्काचे घर मिळणार आहे.या योजनेच्या पहिल्या टप्प्यात कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला याठिकाणी १४ इमारती बांधण्यात येणार आहे. यासाठी या परिसरातील ९३९ झोपडीधारकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

नवीन घरांचे बांधकाम होईपर्यंत निवासाची व्यवस्था करण्यासाठी भाड्यापोटी झोपडपट्टीवासियांना चार हजार रूपये दिले जाणार आहेत. मात्र येथील जनहित कल्याणकारी सोसासटीच्या वतीने महापालिकेच्या विरोधात मुंबई येथील मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. २६ जून रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने झोपडपट्टीवासियांना ३० सप्टेंबरपर्यंत झोपडी रिक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच सुनावणी तारखेपासून १५ दिवसांमध्ये महापालिकेस हमी पत्र सादर करण्याच्या सूचना उच्च न्यायालयाने दिल्या आहेत. हमी पत्र सादर न केल्यास महापालिकेकडून झोपडी रिक्त करणे संदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

> **आम्ही दहावर्षापासून स्वत:चे घर घ्यायचे म्हणत होतो, पण आमच्याजवळ पुरेशी रक्कम नव्हती. शेवटी अकराव्या वर्षी आमचे घर घ्यायचे आमचे स्वप्न प्रूण होणार आहे.**
> **-मृणाल पेणकर**

> **काही मोकळ्या भूखंडावर झोपडपट्टी बसली आहे. झोपडपट्टीमुळे शहराला बकाल रूप प्राप्त झाले असून पंतप्रधान झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पनवेल झोपडपट्टी मुक्त करून पुन्हा शहराच्या सौंदर्यात भर पाडण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेण्यात आले असून लवकरच झोपडपट्टी चे रूपांतर स्मार्ट सिटीत होणार आहे.**
> **-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

## लाच घेताना पनवेल आरटीओतील कनिष्ठ लिपिक जाळ्यात; तिघांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

मेरीडाईन ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ३२ ट्रेलर वाहनाचे स्पिड गव्हर्नर प्रमाणपत्र ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता ३२ हजारांची मागणी केल्याप्रकरणी पनवेल आरटीओतील कनिष्ठ लिपीक संदीप संभाजी बासरे यांना सोमवारी (दि.२४) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाच ही समाजाला लागलेली एक कीड आहे. बक्कल पगार असतांनाही शासकीय काम करून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून लाच स्विकारली जात आहे. त्यात पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय अग्रेसर असल्याचे सोमवारी झालेल्या कारवाईत दिसून आले आहे. मेरीडाईन कंपनीच्या ३२ ट्रेलरचे स्पिड गव्हर्नर प्रमाणपत्र ऑनलाइन नोंदणी करण्याकरिता प्रत्येकी १ हजार रुपये प्रमाणे ३२ गाड्यांचे ३२ हजार रुपयाची मागणी आरटीओतील कनिष्ठ लिपीक संदिप बासरे यांनी केली होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्याकडे तक्रारदाराने रितसर तक्रार दाखल केली होती.

त्या तक्रारीनुसार बासरे पैशाची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले. एसीबीकडून सापळा लावण्याचे ठरले. सोमवारी बासरे यांनी संपूर्ण रक्कम न घेता १५ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीअंती १३ हजार रुपये देण्याचे ठरले. सोमवारी एसीबीच्या अधिकारी यांनी पनवेल आरटीओ कार्यालयात सापळा लावला असता कनिष्ठ लिपीक संदीप बासरे (वय ४५) यांनी रक्कम स्विकारताना रंगेहात पकडले.

याचबरोबर यासाठी मदतनिस म्हणून खासगीत काम करणारे कल्पेश कडू (वय ३१), कपिल पाटील (वय ४५) या तिघांनाही एसीबीने ताब्यात घेतले. त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उरणमध्ये सिलेंडरला आग

**उरण : बातमीदार**

उरण शहरातील राजपाल नाका येथे सोमवारी गॅस सिलेंडरचे दुरुस्तीचे बेकायदेशीर दुकान आहे. या बेकायदेशीर व कोणतेही शासकीय परवानगी नसलेल्या दुकानात गॅस गळती असलेल्या सिलेंडरची दुरुस्ती करत असताना सिलेंडरने पेट घेतला.

अचानक सिलेंडरला आग लागल्याने दुकान चालकाने ते सिलेंडर राजपाल नाक्यावर (खिडकोळी नाक्यावर )भर रस्त्यावर टाकून दिले. आगीचा मोठा भडका उडाला होता. रस्त्यावर अचानक पणे आग लागलेली सिलेंडर टाकल्याने या ठिकाणी प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता.

राजपाल नाका हे बाझारपेठेत असल्याने ते गर्दीचे, वर्दळीचे ठिकाण आहे. मात्र आग विझविल्याने,प्रसंगावधानते मुळे अनेकांचे प्राण वाचले आहे. दुकान चालकने प्रसंगावधान साधत



आग लागलेल्या सिलेंडर वर गोणी टाकून त्यावर पाणी टाकले व आगीवर नियंत्रण मिळविले. सुदैवाने यावेळी कोणतेही जीवितहानी झाली नाही.

जीवितहानी होऊ नये. यासाठी पोलीस प्रशासनातर्फे पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. घडलेल्या घटनेबाबत कोणत्याही व्यक्तीने उरण पोलीस स्टेशन मध्ये येऊन तक्रार दाखल केली नाही. त्यामुळे दुकान चालकावर कोणताही गुन्हा दाखल केला नाही, असे उरणचे वपोनि जितेंद्र मिसाळ यांनी सांगितले.

## निवडक

### रिटघर येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** २७ वर्षीय कविता जितेंद्र भगत (रा.रिटघर) ही महिला राहत्या घरातून कोणाला काही न सांगता पैसे आणि मोबाईल घेऊन निघून गेली. तिचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, मात्र ती सापडून आली नाही. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा वर्ण गोरा, बांधा सडपातळ असून उंची पाच फूट, दोन इंच आहे. अंगात सहावारी साडी, लाल ब्लाऊज घातला आहे. तिला हिंदी, मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार संजय दोरगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वावंजे येथून मुलीचे अपहरण

**पनवेल :** वावंजे येथून बारा वर्षीय मुलगी घराबाहेर गेली आणि ती घरी परत न आल्याने तिचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले. या प्रकरणी अनोळखी इसमा विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कुसुम यादव या वावंजे गाव येथे राहत असून त्यांची बारा वर्षीय मुलगी ही दोन दिवसांपासून शाळेत गेली नसल्याने तिच्या वडिलांनी रागावले म्हणून ती रागाच्या भरात २२ डिसेंबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास कॅन्टीनमधून सरकारी रुग्णालय जवळ, वावंजे येथून मुलगा आरपी याला खाऊ घेऊन येते असे सांगून बाहेर गेली आणि ती घरी परत न आल्याने तिचा इतरत्र शोध घेतला मात्र ती सापडून आली नाही. तिचा बांधा मध्यम, उंची पाच फूट, पाच इंच, रंग सावळा आहे. तिने अंगात निळा फुल ड्रेस, पायात काळा पांढरी सँडल घातली आहे. या मुलीबाबत अधिक माहिती असल्यास तालुका पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## न्यायालयाची खोटी मोहर उमटवून दस्तऐवज तयार करणाऱ्याला अटक

**पनवेल : वार्ताहर**

बनावट नक्कल अभिलेखावर सहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, पनवेल, रायगड आणि सहदिवाणी न्यायाधीश क स्तर यांची खोटी सही करण्यात आली तसेच न्यायालयाची खोटी मोहर उमटवून बनावट दस्तऐवज तयार करून ते वापरात आणण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी येथील आरोपी दीपक फड (रा. कामोठे, कनिष्ठ लिपिक) याला अटक केली.

गुप्ता यांनी मालमत्ते संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला होता. हा दिवाणी चौकशी अर्ज प्रकरण सह दिवाणी न्यायाधीश क स्तर पनवेल यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबत कोणतेही आदेश न्यायालयाने दिलेले नाहीत, मात्र नकलेच्या अर्जावरील आदेशावर दिवाणी न्यायाधीशांची सही असल्याचे दिसत असल्याने याबाबत शहानिशा केली असता सदर आदेशावर असलेली सही त्यांची नसल्याचे समजून आले. त्यानंतर संगणकीय प्रणाली मधील सीआयएस मध्ये पडताळणी केली असता हे प्रकरण संगणकीय प्रणाली मधून डिलीट केल्याचे दिसून आले.

अज्ञात इसमाने नक्कल मिळणेबाबतच्या दस्तऐवज पडताळणी करता पिठासीन अधिकारी यांच्या खोट्या आदेशान्वये खोटे नोंद पुस्तक क्रमांक देऊन न्यायालयीन अभिलेख तयार केला आणि बनावट नक्कल अभिलेखावर न्यायाधीशांची खोटी सही केली. त्यामुळे पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पनवेल शहर पोलिसांनी चौकशी केली असता दीपक फड याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याने पोलिसांनी त्याला अटक केली.

## पनवेलमधील शिवसेना वैद्यकीय कक्ष कार्यालयास खासदार बारणेंची भेट

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात उभारण्यात आलेल्या शिवसेना पनवेल तालुका जनसंपर्क कार्यालय तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पनवेल या कार्यालयास खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट देवून तेथील कामकाजाची माहिती घेतली. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचा विशेष सत्कार केला.

या वेळी कर्जत उरण शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अतुल भगत, शिवसेनेचे तालुकाप्रमुख भरत अनुसया ज्ञानदेव जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे महानगर प्रमुख राजाभाऊ मारुती नलावडे, मराठा



समन्वयक समिती महाराष्ट्र राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष देविदास राजळे पाटील, शिवसेनेचे दत्तात्रेय कोंडीलकर, मेहबूब शेख, रुपेश राऊत, संतोष वाहुळे, संजय बागडे, सुनील फाळके इतर शिवसैनिक उपस्थित होते.

## मोहोपाडा येथे नेत्र तपासणी शिबिर

**मोहोपाडा :** आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू ऑपरेशन शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.२८) सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत गणेश मंदिर येथे आयोजन करण्यात आले आहे. ऑपरेशनसाठी रेशन कार्ड आणि आधार कार्डची झेरॉक्स तसेच बीपी शुगरच्या गोळ्या असतील तर घेऊन यावे, असे आवाहन डॉ.प्रकाश पाटील यांनी केले आहे.

## महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अकाउंट फायनान्स विभागातर्फे डिसेंबर शुक्रवारी (दि.२०) करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या करिअर मार्गदर्शनसाठी प्रा. आनंद शेलार यांनी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल अकाउंट व फायनान्स विभागातील शाखेतील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा यांनी केले तसेच अकाउंट अँड फायनान्स विभागातील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

दरम्यान, रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात पारितोषिक वितरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि.२४) वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी शैक्षणिक स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्राचार्य निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक नंदकुमार भोईर आणि सहाय्यक शिक्षिका खुशबू भोसले यांनी केले.

या सोहळ्यास जनार्दन भगात शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स संजय भगत, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कामगार सेल तळोजा मंडळाचे अध्यक्ष जयदास तेलवणे, भाजप खारघर तळोजा मंडळाचे चिटणीस सचिन वासकर, अल्पसंख्यांक मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याचे सरचिटणीस इरशाद शेख, महिला मोर्चा खारघरचे अध्यक्षा साधना पवार, माजी नगरसेविका अनिता पाटील, भाजप खारघर सरचिटणीस दीपक शिंदे, सचिव शैलेंद्र त्रिपाठी, कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अनिल खोपडे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष वैद्यकिय विभाग डॉ. विजय उजलांबे, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्या माहेश्वरी झिरपे, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते.





## सीकेटी विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी (दि.२३) प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या पारितोषिक वितरण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचा माजी विद्यार्थी डॉ. प्रशांत रामचंद्र पाटील (डेंटिस्ट) हे उपस्थित होते.



मुख्याध्यापक सुभाष मानकर यांच्या हस्ते प्रमुख अतिथी यांचे शाल श्रीफळ व गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा अर्चना पाटील, पालक प्रतिनिधी गोविंद खेडकर, संध्या परभणे इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी या मान्यवरांचे पुष्प देऊन मुख्याध्यापक सरांनी गुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली त्यांना संगीत साथ विद्यालयाचे संगीत शिक्षक संतोष खरे आणि अर्चना पाटील यांनी दिली. पारितोषिक वितरण सोहळ्यात पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना शालांतर्गत, बाह्य स्पर्धा, वार्षिक क्रीडा स्पर्धांचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व मान्यवरांचे आभार सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी मानले. अशाप्रकारे पारितोषिक वितरण सोहळा आनंदात व उत्साहात झाला.

## संपादकीय

# मराठी माणसाचा पुळका

**विधानसभेपाठोपाठ महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता दिसू लागताच ‘मराठी माणसाचा मुद्दा’ हेतूपुरस्सर पेटवला जातो आहे हे उघडच दिसते. मुंबई आणि महाराष्ट्र हा मराठी माणसाचा होता, आहे आणि राहणार असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ‘फेक नरेटिव्ह’ तयार करणाऱ्यांना ठणकावून सांगितले आहेच, पण मुंबई महापालिकेत वर्षानुवर्षे सत्ता बळकावून बसलेल्यांनी मराठी माणसाला मुंबईबाहेर दूर वसई-विरार, कल्याण-डोंबिवलीकडे का जाऊ दिले हा प्रश्न विचारला गेलाच पाहिजे.**

राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीचा पार धुव्वा उडाला. त्यानंतर काही दिवस ईव्हीएमच्या नावाने गळा काढत मविआच्या नेत्यांनी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला मिळालेले भरघोस यश नाकारण्याचा प्रयत्न केला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांना ‘संविधान बचाव’च्या फेक नरेटिव्हमुळे थोडेफार यश मिळाले होते. त्या किरकोळ यशाने इंडिया आघाडीची ही नेते मंडळी इतकी हुरळून गेली की विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांच्यातील बेबनाव चव्हाट्यावर आला. दरम्यान, भाजपप्रणित महायुतीने जनहिताच्या कार्यक्रमांनी लोकांची मने जिंकून घेतली आणि राज्यातील जनतेने त्यांना भरभरून कौल दिला. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारची स्थापना झाली. विधानसभेपाठोपाठ लवकरच महापालिकांच्या निवडणुका होण्याची चिन्हे दिसू लागताच शिवसेना उबाठा गटाची भाषा बदलू लागली. उद्धव ठाकरे पुन्हा हिंदुत्वरक्षणाबद्दल बोलू लागले. काँग्रेसच्या सोबतीने सत्तेचा आनंद उपभोगताना त्यांना हिंदुत्वाचा विसर पडला होता. आता निवडणुकांमध्ये धुव्वा उडाल्यानंतर हिंदुत्वासोबतच त्यांना मराठी माणसाचीही आठवण झाल्याचे दिसते आहे. निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही दिवसांतच एका मागोमाग एक मराठी-अमराठी संघर्षाच्या घटना मुंबई आणि आसपासच्या परिसरात विशिष्ट माध्यमांतून समोर येऊ लागल्या आहेत. कुठे हिंदी भाषिक रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठीत बोलण्यास नकार दिल्याचे सांगितले गेले. मराठीत बोलणार नाही, तुम्हीच मारवाडीत बोला असा सूर कुणा दुकानदाराने लावल्याचीही घटना समोर आली. संबंधित दुकानदाराला भाजपच्याच नेत्यांकडून योग्य ती समज देण्यात आली. मराठी माणसाचा अपमान निषेधार्हच आहे. पण, भाजपचे सरकार आल्याने परप्रांतीय माजल्याचे फेक नरेटिव्ह सेट करण्याचे हे प्रयत्न आहेत अशी शंका सहज यावी अशातऱ्हेने या घटना समोर आणल्या जात आहेत. याच मालिकेत आणखी एक घटना ठळकपणे समोर आली. कल्याणमध्ये अखिलेश शुक्ला नावाच्या सरकारी कर्मचाऱ्याने शेजारी राहणाऱ्या मराठी कुटुंबातील सदस्यांना मारहाण केल्याची दृश्ये बातम्यांमधून झळकली. मराठी माणसाला उद्देशून त्याने काही उद्दाम विधानेही केली. या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने गंभीर दखल घेतली. अशा माजोरड्यांचा माज उतरवल्याशिवाय राहणार नाही, असे फडणवीस यांनी ठणकावून सांगितले. त्यानंतर शुक्लाच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हा शुक्ला राज्याच्या पर्यटन विकास महामंडळाचा कर्मचारी असल्याचे समोर येताच त्याच्यावर निलंबनाची कारवाईही करण्यात आली. तरीही उबाठा गटाकडून विधिमंडळ अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. परप्रांतियांकडून मराठी माणसाशी मुजोर वर्तनाच्या, घरे नाकारण्याच्या घटना भाजपची सत्ता आल्यापासून वाढल्या असल्याचा आरोप सभागृहामध्ये करण्यात आला. त्यावर फडणवीस यांनी मुंबई आणि महाराष्ट्र मराठी माणसाचा होता, आहे आणि राहणार हे ठणकावून सांगितले आहेच, मात्र महापालिका निवडणुकांवर डोळा ठेवून मराठी माणसाचा मुद्दा मुद्दाम पेटवला जातो आहे हे लपून राहिलेले नाही.

# माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयींचे स्मरण



देशाचे दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची आज १००वी जयंती आहे. अटलजींचा प्रवास इतका संस्मरणीय होता की, लोक आजही त्यांना मनापासून आठवतात. त्यांनी देशाच्या विकासासाठी दिलेले योगदान लक्षात घेता मोदी सरकारने २०१४मध्ये त्यांची जयंती हा ’सुशासन दिन’ म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे संपूर्ण देशात दरवर्षी २५ डिसेंबर हा दिवस सुशासन दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म २५ डिसेंबर १९२४ रोजी मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे झाला. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला होता. १९४२मध्ये महात्मा गांधींच्या भारत छोडो चळवळीत ते सक्रिय होते आणि तुरुंगातही गेले होते. त्यांनी आपले प्रारंभिक शिक्षण ग्वाल्हेरमधून केले आणि नंतर ते कानपूरला गेले. दरम्यान, त्यांनी कानपूरच्या डीएव्ही कॉलेजमधून एलएलबी केले. या वेळी अटलबिहारी वाजपेयी आणि त्यांच्या वडिलांनी एलएलबीचे शिक्षण एकत्र घेतले होते आणि या काळात पिता-पुत्र दोघेही एकाच वसतिगृहाच्या खोलीत राहत होते. त्यानंतर पुढे ते राजकारणात आले.

अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात पत्रकार म्हणून केली. त्यांनी राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन यासाठी काम केले. जम्मू-काश्मीरमध्ये लागू करण्यात आलेल्या परमिट पद्धतीला विरोध करण्यासाठी डॉ. मुखर्जी श्रीनगरला गेले तेव्हा त्यांनी राजकारणात पाऊल ठेवले. परमिटची पद्धत मोडून तो श्रीनगरला गेले. या वेळी ते या घटनेचे वृत्तांकन करण्यासाठी पत्रकार म्हणून तिथे उपस्थित होते.

अटलजींनी एकदा एका मुलाखतीत सांगितले होते की, मुखर्जी यांना अटक झाली होती, पण मी परत आलो. या घटनेनंतर काही दिवसांनी डॉ. मुखर्जी यांचे आजारपणामुळे निधन झाले. त्यानंतरच त्यांनी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला आणि देशाचे एक आदर्श पंतप्रधान म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले. कवी म्हणून स्वतंत्र ओळख होती.

संयुक्त राष्ट्र महासभेत हिंदीत भाषण करणारे अटलबिहारी वाजपेयी हे पहिले भारतीय राजकारणी होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, नवी दिल्ली आणि गुजरात या चार राज्यांतील सहा लोकसभा मतदारसंघात विजय मिळवला होता. अटलबिहारी वाजपेयी हे ४७ वर्षे खासदार होते. त्यापैकी ते ११ वेळा लोकसभेचे आणि दोम वेळा राज्यसभेचे सदस्य होते. देशाचे पंतप्रधान होणारे ते भाजपचे पहिले नेता होते.

अटलबिहारी वाजपेयींनी तीन वेळा पंतप्रधान म्हणून जबाबदारी पार पाडली. ते १९९६मध्ये १३ दिवसांचे पंतप्रधान होते. १९९८ ते १९९९ या कालावधीत १३ महिन्यांकरिता पंतप्रधानपद भूषविले. तिसऱ्यांदा १९९९ ते २००४ या काळात त्यांनी पंतप्रधानपदाचा कार्यकाळ पूर्ण केला.

सन १९९८मध्ये भारताने राजस्थानमधील पोखरण येथे यशस्वी अणुचाचणी केली. या चाचणीतून भारताला आण्विक महाशक्ती म्हणून ओळखलं जाऊ लागले, तर अणुचाचणीला ’ऑपरेशन शक्ती’ म्हणून ओळखले जाते.

अटलबिहारी वाजपेयी अविवाहित होते. कामात वेळ मिळाला नसल्याने विवाह करण्यासाठी वेळ मिळाला नसल्याचे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. २००९मध्ये पक्षाघातामुळे वाजपेयींना शारीरिक आजाराला सामोरे जावे लागले. त्यांना आवाज आणि हाताची हालचाल करताना अडथळा झाला होता.

काही वर्षे आजारी राहिल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी नवी दिल्लीत निधन झाले.

### या पुरस्कारांनी झाला होता गौरव

१९९२ : ’पद्मविभूषण’, भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार; १९९३ : कानपूर विद्यापीठातून साहित्यात डॉक्टरेट पदवी, १९९४ : लोकमान्य टिळक पुरस्कार, १९९४: उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार, १९९४ : भारतरत्न पंडित गोविंद वल्लभ पंत पुरस्कार, २०१५ : ’भारतरत्न’, भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार; २०१५ : बांग्लादेश मुक्तिजुधो सन्मानोना (बांगलादेश मुक्तियुद्ध पुरस्कार), बांगलादेश सरकारने दिलेला सर्वोच्च पुरस्कार.

**(साभार : इंटरनेट)**

# ख्रिश्चन बांधवांचा सण नाताळ



नाताळ किंवा ख्रिसमस हा एक ख्रिस्ती सण आहे. हा सण दर वर्षी २५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी ख्रिस्ती बांधवांचे लाडके प्रभू येशू यांचा जन्म झाला होता. काही ठिकाणी हा सण ६, ७ किंवा १९ जानेवारीला एपिफानी म्हणून साजरा करतात. हा सण १२ दिवसांचा असून ख्रिसमस्टाईड पर्वाची सुरुवात होते. जगाभरात हा सण साजरा होतो. काही ठिकाणी मध्यरात्री, तर काही ठिकाणी संध्याकाळी हा सण साजरा केला जातो.

नाताळ हा शब्द नातूस म्हणजे जन्म या लॅटिन शब्दापासून बनला आहे. या दिवसाला इंग्रजी भाषेत ख्रिसमस म्हणतात. ख्रिसमस म्हणजे ख्रिस्तमहायज्ञ (मिस्सा). ख्रिस्त महागुरुंना ख्रिस्तमसच्या दिवशी तीन मिस्सा अर्पण करण्याची परवानगी दिली गेली. ख्रिस्ताच्या जन्मघटकेचे स्मरणार्थ पहिला मिस्सा मध्यरात्री अर्पण केला जाते. ख्रिस्ताचा जन्म मध्यरात्री झाला अशी मान्यता आहे. दुसरा मिस्सा पहाटे व तिसरा मिस्सा दिवसात अर्पण केला जात असे. मध्यरात्रीचा मिस्सा बेथलहेम येथे अर्पण केला जाते. हे इस्राईल देशातील एक छोटंसं गावं आहे. याच गावात ख्रिस्तांचा (प्रभू येशू) जन्म झाला. या दिवशी इथून लोकं रात्रीच्या समयी मिरवणूक काढून जेरूसेलम गावी पहाटेच्या सुमारास पोहचतात. तिथे दुसरा मिस्सा अर्पण केला जातो. नंतर दिवसा महामंदिरात सर्व ख्रिस्ती बांधव एकत्र होतात त्या वेळी तिसरा मिस्सा अर्पण होत असे.

नाताळ सणामध्ये भेटवस्तू देण्याची प्रथा अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः लहान मुले या सणाची खूप आतुरतेने वाट बघतात. सांताक्लॉज येऊन मुलांना भेट वस्तू आणि खाऊ देतात अशी मुलांना समज असते.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छा पत्रे देऊन परस्पर अभिनंदन करतात. आपल्या घरात रोषणाई करतात. घराला सजवतात. ‘ख्रिसमस वृक्ष सजावट’ करतात. (ख्रिसमस ट्री - नाताळसाठी सजवलेले सूचिपर्णी झाड) असते. हे झाड ह्या सणाचा एक अविभाज्य घटक आहे. ख्रिसमस ट्री हे स्वर्गातल्या ईडन बागेतील झाड व क्रूसाचे झाड यांचे प्रतीक आहे.

या सणावर चॉकलेट केक बनवले जाते. कॅथोलिक ख्रिस्तसभेमध्ये ख्रिस्तजन्माची स्मृती म्हणून गोशाळा किंवा गायीचा गोठा तयार करण्याची परंपरा आहे. हा सण लहान थोर सर्वे उत्साहाने आनंदाने साजरा करतात. हा सण सर्वांना एकत्र आणण्याचा सण आहे.

**(साभार : वेबदुनिया मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

# ट्रेन तिकीट बुकिंग ते हॉटेल, कॅब बुकिंग आता एकाच अ‍ॅपने




भारतीय रेल्वेचा प्रवास आता आणखी सोपा होणार आहे, कारण- रेल्वे लवकरच प्रवाशांसाठी नवे सुपर अ‍ॅप लाँच करणार आहे, ज्यावर सध्या वेगाने काम सुरू आहे. हे अ‍ॅप लाँच झाल्यानंतर प्रवासाशी संबंधित सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. आयआरसीटीसीच्या या नव्या अ‍ॅपमध्ये प्रवाशांना ट्रेनची स्थिती तपासणे, तिकीट बुकिंग करणे आणि त्यांच्या आवडीचे जेवण ऑर्डर करणे या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. रिपोर्ट्सनुसार डिसेंबरअखेरपर्यंत हे अ‍ॅप लाँच करण्याची तयारी सुरू आहे.

भारतीय रेल्वे हे सुपर अ‍ॅप लाँच करणार आहे. यामध्ये रेल्वे प्रवासाशी संबंधित सर्व माहिती प्रवाशांना उपलब्ध करून दिली जाईल. या अ‍ॅपचे डिझाईन रेल्वे माहिती प्रणाली केंद्राने केले आहे. हे अ‍ॅप तुम्ही तुमच्या मोबाईलवर डाउनलोड करू शकता. त्यामध्ये तुम्हाला रेल्वे तिकीट बुक करणे, प्लॅटफॉर्म पास मिळवणे, ट्रेनचे वेळापत्रक व जेवण ऑर्डर करणे या सुविधादेखील मिळतील. या अ‍ॅपद्वारे प्रवाशांना संपूर्ण प्रवासाचा मागोवा घेता येणार आहे.

आयआरसीटीसी सुपर अ‍ॅपद्वारे रेल्वे तिकीट आणि जेवण ऑर्डर करण्याशिवाय इतरही अनेक सुविधा उपलब्ध असतील. त्यामध्ये फ्लाइट बुकिंग, कॅब आणि हॉटेल बुकिंग ते आरक्षित तिकीट बुकिंग, अनारक्षित तिकीट बुकिंग व टूर पॅकेज बुकिंगपर्यंत सर्व काही करता येईल. त्याशिवाय ई-कॅटरिंग, रिटायरिंग रूम व एक्झिक्युटिव्ह लाउंजसाठी बुकिंगची सुविधाही मिळू शकेल. आतापर्यंत प्रवाशांना रेल्वे प्रवासाशी संबंधित अपडेटसाठी अनेक प्सचा वापर करावा लागत होता.

आयआरसीटीसीद्वारे आरक्षित तिकीट बुकिंगसाठी एक स्वतंत्र प्लॅटफॉर्मदेखील सुरू राहील. आयआरसीटीसी आणि सीआयआरएसद्वारे प्रवाशांना ही सुविधा दिली जाणार आहे. वास्तविक रेल्वेला आपले महसुली उत्पन्न वाढवायचे आहे आणि या अ‍ॅपच्या मदतीने हेदेखील साध्य होईल, अशी व्यवस्थापनाला आशा आहे. या सुपर अ‍ॅपसंबंधित सर्व आवश्यक बाबींची प्रगती वा तयारी सीआयआरएसद्वारे केली जात आहे. डिसेंबर महिन्यातच हे अ‍ॅप आणले जाऊ शकते. त्यात सध्या अनेक सुधारणा केल्या जात आहेत आणि त्या पूर्ण झाल्यावर हे अ‍ॅप लाँच केले जाईल.

# व्हायोलिनवादक प्रभाकर जोग



### निमित्त

व्हायोलिन वादक, संगीत संयोजक आणि नंतर संगीतकार म्हणून प्रभाकर गणेश जोग यांनी सहा दशकांहून अधिक काळ मराठी आणि हिंदी चित्रपट क्षेत्रात कलेचा अमीट ठसा उमटवला. त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील हरेगाव बेलापूर इथे २५ डिसेंबर १९३२ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण तत्कालीन अहमदनगर व पुण्यात झाले. सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्ये त्यांनी पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. वडिलांच्या अकस्मात निधनानंतर अवघ्या बाराव्या वर्षी अनेक छोटीमोठी कष्टाची कामे करून त्यांनी अर्थार्जन केले वे शिक्षण पुरे केले. ते गायन-वादनही शिकले तसेच व्हायोलिनची साथ करून त्यांनी पैसेही मिळवले.

लहानपणापासून प्रभाकर जोग यांना गायनाची आवड असल्याने त्यांनी गजाननबुवा जोशी व नारायणराव मारुलकर यांच्याकडून गायनाचे धडे घेतले. थोरले बंधू वामनराव यांच्याकडून त्यांनी व्हायोलिनचे शिक्षण घेतले. गायन-वादनाचे स्वरांकन (नोटेशन) करण्याची कला त्यांना चांगलीच अवगत होती. त्यांची आकाशवाणी, नागपूर केंद्रावर ‘व्हायोलिन-वादक’ म्हणून नियुक्ती झाली होती. कीर्तनकार नावडीकरांनी जोगांना पुण्यात आश्रय दिला, आर्थिक साहाय्य केले. त्यानंतर जोगांनी मालती पांडे, कालिंदी केसकर, गजाननराव वाटवे, बबनराव नावडीकरांच्या गायनाला, तर नृत्यांगना रोहिणी भाटे यांच्या नृत्यांच्या कार्यक्रमांना व्हायोलिनची साथ केली.

एस.पी.महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना त्यांची व्हायोलिनवादनाची साथ चालू होती. महाविद्यालयाच्या संमेलनाच्या वेळी जोग यांनी व्हायोलिनवर वाजवलेल्या सुमधुर गाण्यांना ‘वन्समोअर’ मिळाला. ही गाणी समोरच राहणारे सुधीर फडके यांच्या कानावर पडली. त्यांचे वादन आवडल्याने बाबूजींनी जोग यांना भेटायला बोलावले. जलद व अचूक स्वरांकन लिहिण्याच्या कौशल्यामुळे बाबूजींनी त्यांना साहाय्यक म्हणून काम करण्यास सांगितले.

आकाशवाणी, पुणे केंद्र निर्मित ग.दि. माडगूळकर व बाबूजींच्या अजरामर ‘गीतरामायणा’च्या निर्मितीत (१९५५-५६) जोग यांचा मोठा सहभाग होता. पुण्यातील जोगांच्या घरातच गायक-वादकांच्या तालमी घेणे, स्वरांकन करणे, व्हायोलिनची साथ करणे अशी कामे रात्रंदिवस चालायची. दर आठवड्याला सकाळी ८.४५ वाजता गाणे प्रत्यक्ष सादर होत असे. ‘चला राघवा चला’ हे गीत विख्यात नट चंद्रकांत गोखले यांनी गायलेले होते. हे गीत जोग यांनी स्वत: स्वतंत्रपणे स्वरबद्ध केलेले होते. एचएमव्ही कंपनीच्या एल.पी. रेकॉर्डर्समध्येसुद्धा जोग यांनी स्वरांकन करून व्हायोलिनची साथ केलेली आहे.

आकाशवाणी, पुणे केंद्रात, संगीतकाराची ‘बी’ ग्रेड मिळाल्यावर त्यांनी अनेक गीते, संगीतिका स्वरबद्ध केल्या. ‘ब्रह्मकुमारी अहिल्या’ ही त्यांची पहिली संगीतिका होय. त्यांनी मासिक गीतासाठी आपल्या पत्नी नीला यांच्या आवाजात गदिमांचे ‘लपविलास तू हिरवा चाफा’ हे गीत स्वरबद्ध करून सादर केले. नंतर याच गीताची मालती पांडे बर्वे यांच्या स्वरातली जोगांची पहिली ध्वनिमुद्रिका (१९५६) प्रकाशित होऊन लोकप्रिय झाली.

जोग हे स्वरांकन जलद करून देत असल्याने सुधीर फडक्यांनी राजा परांजपे यांच्या ‘ऊनपाऊस’या चित्रपटापासून सहायक संगीत दिग्दर्शक म्हणून जोग यांची निवड केली. बाबूजींबरोबरच्या अनुभवांची शिदोरी त्यांना यशस्वी संगीतकार बनण्यात उपयोगी पडली. त्यांनी ती जोपासली, वाढवली आणि आपली स्वतंत्र शैली निर्माण केली.

जोग यांनी २२ चित्रपटांचे स्वतंत्रपणे संगीत दिग्दर्शन केले आहे. त्यांना अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. अशा या महान व्हायोलीनवादकाचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. **-रवींद्र आपटे**

### क्लिक...क्लिक...!



**मुरूड : बच्चेकंपनीला नाताळची सुट्टी पडल्याने पर्यटक कुटुंबासह पर्यटनासाठी आले आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# निरोगी आरोग्यासाठी सकाळी उठल्यानंतर ‘हे’ करा



सरते २०२४ हे वर्ष तुम्हालादेखील रात्री उशिरा झोपणे आणि सकाळी उशिरा उठणे, व्यायाम न करणे तसेच सतत मोबाइलवर रील्स पाहणे या सर्व गोष्टींमध्ये गेले असेल, तर या सर्व वाईट सवयी सोडून येणाऱ्या नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या सवयींपासून करा. होमियो अमीगोचे संस्थापक आणि सीईओ करण भार्गव यांनी सकाळच्या दिनचर्येत समाविष्ट करण्यासाठी खाली काही सवयी शेअर केल्या आहेत.

तुमच्या ठराविक वेळी जागे व्हा : तुमच्या नैसर्गिक सर्केडियन लयांशी ताळमेळ वाढल्याने तुम्हाला विश्रांती आणि सतर्कता जाणवते, फोकस आणि कार्यक्षमता वाढते.

शरीर हायड्रेट करा : झोपेतून उठल्यावर पाणी प्यायल्याने तुमचे शरीर रिहायड्रेट होते आणि तुमचे चयापचय सुरू होते.

शारीरिक हालचाली करा : सकाळचा व्यायाम रक्ताभिसरण, मनःस्थिती आणि उर्जेची पातळी वाढवतो, तुम्हाला दिवभराच्या कामासाठी ऊर्जा देतो.

ध्यानाचा सराव करा : काही मिनिटांच्या ध्यानामुळे तणाव कमी होतो आणि मानसिक स्पष्टता सुधारते.

दिवसभराचे नियोजन करा : कामाचे नियोजन दिवसभराच्या कार्यांना प्राधान्य देते आणि यामुळे वेळेचे व्यवस्थापन सुधारते.

पौष्टिक नाश्ता करा : संतुलित जेवणामुळे आवश्यक ऊर्जा मिळते आणि एकाग्रता सुधारते.

स्क्रीन वेळ मर्यादित करा : मोबाइलवर जास्त वेळ वाया घालवणे टाळा. यामुळे वेळही वाचेल आणि तणावही दूर होईल.

कृतज्ञता व्यक्त करा : आपण ज्या गोष्टींसाठी कृतज्ञ आहात, त्याबद्दल विचार केल्याने सकारात्मक दृष्टिकोन वाढतो आणि तणाव कमी होतो.

सर्वात महत्त्वाचे काम आधी संपवा : तुमचे सर्वात महत्त्वाचे कार्य लवकर संपवा, ज्यामुळे ते चांगल्या प्रकारे पूर्ण होते.

सकाळी उठल्यानंतर आपण सर्वात पहिले जी कामे करतो त्यावरच आपला संपूर्ण दिवस कसा जाईल हे अवलंबून असते. जसे की आपण सकाळी उठल्यावर सर्वप्रथम योगा, मेडिटेशन, व्यायाम किंवा मॉर्निंग वॉक अशा काही अ‍ॅक्टिव्हिटीज केल्या की आपला संपूर्ण दिवस अगदी आनंदात आणि मजेत जातो तसेच यामुळे आपल्याला दिवसभर फ्रेशदेखील वाटते. जर दिवसाच्या सुरुवातीलाच आपले मन, शरीर आणि आत्मा आपल्याला प्रसन्न करायचे असेल, तर सकाळी उठल्यानंतरचे आपले रूटिनही तसेच ठेवायला पाहिजे.

# लाडकी बहिण योजनेची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात -ना. तटकरे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

लाडकी बहिण योजनेसंदर्भात राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्वाची अपडेट दिली आहे. विधानसभा निवडणूकीनंतर योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम मंगळवार( दि. २४) पासुन जमा होण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे.



विधानसभा निवडणूकीमुळे लाडकी बहिण योजनेच्या लाभाचे वितरण थांबविण्यात आले होते. आचारसंहितेमुळे या योजनेला काही काळ ब्रेक लागला होता. निवडणूक आचारसंहीता उठल्यानंतर लाडकी बहिण योजनेतील लाभाचे वितरण पुन्हा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आले आहे. १२ लाख ८७ हजार बहिणींच्या खात्त्यात या योजने आंतर्गत दिला जाणारा सन्मान निधी मंगळवारी जमा करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसात उर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात सन्मान निधी जमा केला जाणार आहे अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला रायगड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला. ३ लाख ४७ हजार महिला या योजनेच्या लाभार्थी ठरल्या. ५३३ अर्ज त्रृटीमुळे फेटाळले गेले. २ हजार २६६ अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. जुलै महिन्यापासून या योजनेला सुरूवात करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात १ लाख लाख ८१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. दुसऱ्या टप्प्यात १ लाख ६८ हजार प्राप्त झाले. एकूण जिल्ह्यातून ३ लाख ४९ हजार ९२१ जणींनी योजनेसाठी अर्ज भरले होते. यातील ९९ टक्के अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. ३ लाख ४७ हजार ०४८ अर्ज मंजूर करण्यात आले होते.

योजनेसाठी पात्र ठरलेल्या महिलांना जुलै, ऑगस्ट महिन्यासाठी एकत्रित ३ हजार रुपये, यानंतर सप्टेंबर महिन्यासाठी दिड हजार रुपये, तर आचारसंहीता लागण्यापूर्वी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे तीन हजार रुपयांचे वितरण करण्यात आले. असे तीन टप्प्यात एकूण ७ हजार ५०० रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीमुळे ही योजना आचारसंहितेच्या कचाट्यात सापडली होती. आचारसंहितेमुळे लाभार्थ्यांना निधी वितरण थांबविण्यात आले होते.

मात्र आता या योजनेतील आचारसंहितेचा अडसर दूर झाला असून लाडक्या बहिणांना सन्मान निधीचे वितरण पुन्हा एकदा सरू झाले आहे. टप्प्याटप्प्याने सर्वांच्या खात्यात लाभाची रक्कम जमा होणार असल्याचे तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

आधार प्रमाणिकरण होत नसल्याने अनेक महिला या योजनेच्या लाभा पासून वंचित राहिल्या होत्या. पण आता ज्या महिलांचे आधार प्रमाणीकरण झाले, त्यांनाही लाभा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### जिल्ह्यातील तालुकानिहाय लाभार्थ्यांची संख्या

*अलिबाग - ३२ हजार ८८३, मुरुड - १२ हजार ३२८, कर्जत - ३० हजार ५७९, खालापूर - २८ हजार १५४, महाड - २६ हजार १५३, माणगाव - २७ हजार २८३, म्हसळा - ९ हजार ६८८, पनवेल - ६० हजार ५१९, पेण - ३३ हजार ७५९, पोलादपूर - ७ हजार ६५० रोहा -२५ हजार ०२२, श्रीवर्धन - १४ हजार २२६ सुधागड - १० हजार ५९६, तळा - ७ हजार २४५, उरण - २१ हजार ०८६ इतके अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.*

# खोपोली शहरातील भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरण उपक्रमाची सुरुवात

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली शहरात भटक्या श्वानांची वाढती संख्या आणि श्वानदंशाच्या घटना नियंत्रित करण्याकरीता नागरिकांच्या व वाढत्या मागणीच्या अनुषंगाने खोपोली नगर परिषदेच्या वतीने श्वानांचे निर्बिजीकरण आणि अँटी रेबीज व्हॅक्सिनेशन मोहिम राबविण्याचा संकल्प मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील यांनी केला होता. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या तरतुदीनुसार पेट्स फोर्स या संस्थेची नियुक्ती करण्यात आली. दि २३ डिसेंबर २०२४ रोजी खोपोली शहरातील समाज मंदिर रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या मोहिमेस सुरूवात करण्यात आली.

खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ पंकज पाटील, माजी नगरसेवक किशोर पानसरे, सामाजिक कार्यकर्ते विजय तेंडुलकर, जैन संघटनेचे किशोर ओसवाल, गोरक्षक तथा प्राणीमित्र हनीफ कर्जीकर, अमोल ठकेकर, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य, नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच जागरूक नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.

खोपोली शहरातील भटक्या श्वानांना टप्प्याटप्प्याने विभागवार सुरक्षित पकडण्यात येणार असून, त्यांना रेस्क्यू व्हॅन मधून निर्बिजीकरण केंद्रात नेण्यात येणार आहे. निर्बिजीकरणासोबत अँटी रेबीज व्हॅक्सिनेशनही केले जाणार आहे. शस्त्रक्रियेनंतर श्वानाची प्रकृती स्थिरस्तावर झाल्यानंतर ज्या विभागातून त्यांना ताब्यात घेतले आहे. तेथेच पुन:श्च सोडण्यात येणार असल्याची माहिती पेट्स फोर्स संस्थेचे विनोद साळवी यांनी दिली. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय परिसर आणि समाज मंदिर रोडवरील श्वानांना ताब्यात घेण्यात आले आहे.

आज पासून दररोज ही मोहीम राबवण्यात येणार आहे. या मोहिमेचे सर्व स्तरावरून स्वागत होत आहे.

# व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत कळंब मराठी शाळेचे यश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका शिक्षण विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणुन व्यक्तिमत्व विकास स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कर्जत तालुकास्तरीय व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत कळंब शालेच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूहगान मध्ये लहान गटात दुसरा आणि मोठ्या गटात तिसरा क्रमांक मिळविला.



रायगड जिल्हा परिषद सेस फंडातून जिल्ह्यात तालुका स्तरावर विद्यार्थ्यंसाठी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. तालुक्यातील २७ केंद्रांमध्ये आणि नंतर सहा बिट पातळीवरून झालेल्या स्पर्धेतील पहिले तीन क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना तालुक्यास्तरीय व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत सहभाग देण्यात आला. या स्पर्धेत कळंब मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले. तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील आणि शिक्षिका सुनिता येंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# आरसीएफतर्फे मच्छीमार महिलांना शितपेट्या वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स (आरसीएफ) निमिटेड, थळ तर्फे निगमित सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत कारखाना परिसरातील थळ मच्छीमार महिलांना शीतपेट्यांचे वाटप करण्यात आले. सोमवारी (दि. २३) कारखान्यालगतच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात कार्यकारी संचालक (थळ) नितिन हिरडे आणि महाव्यवस्थापक संजीव हरळीकर यांच्या शुभहस्ते हे वाटप करण्यात आले.

थळ कारखाना परिसरातील थळ मच्छीमार सहकारी सोसायटीत आणि नवेदार नवगाव बोरेश्वर सर्वोदय सहकारी सोसायटी यांच्या कडून १००० मच्छीमार महिलांना मासे व्यवसायासाठी शितपेट्यांची आवश्यकता असून आरसीएफ च्या सीएसआर अंतर्गत त्या देण्याबाबत आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आरसीएफ व्यवस्थापनातर्फे मासे व्यवसायासाठी पूरक अशा १००० शितपेट्या उपलब्ध करून देण्यात आल्या.

महिला मच्छिमार अनेक वेळा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत, त्यांचे काम करत असतात, आणि त्यांना त्यांचं उत्पादन ताजे आणि सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य उपकरणांची आवश्यकता असते. या दृष्टीने महिला मच्छिमारांच्या व्यवसायातील उत्पादकता वाढवण्यासाठी आणि त्यांच्या जीवनशैलीला सुधारण्यासाठी आरसीएफद्वारा सीएसआर उपक्रमांअंतर्गत शीतपेट्यांचे वितरण करण्यात आले.

सीएसआरच्या माध्यमातून सामाजिक दृष्टीकोन ठेवत समाजाच्या विविध घटकांना मदत करण्यासाठी आरसीएफ सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला सशक्तीकरणासाठी आणि त्यांना यशस्वी जीवन जगण्यासाठी आरसीएफने आपली भूमिका प्रगल्भपणे पार केली आहे. आपल्याला विश्वास आहे की या शीतपेटीमुळे या महिला मच्छिमारांच्या जीवनात एक महत्त्वपूर्ण बदल घडेल आणि ते अधिक आत्मविश्वासी होऊन आपला व्यवसाय आणि कुटुंब चालवू शकतील, असे प्रतिपादन कार्यकारी संचालक (थळ) नितिन हिरडे यांनी या वेळेस केले. याचबरोबर महाव्यवस्थापक संजीव हरळीकर यांनी सद्य परिस्थितीत महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचे महत्त्व विशद करून सीएसआरच्या माध्यमातून कारखाना परिसरात विविध लोकोपयोगी उपक्रम राबविले जातील याची ग्वाही दिली.

या वेळी उपमहाव्यवस्थापक (मानव संपदा प्रशासन) विनायक पाटील, उपमहाव्यवस्थापक (ईटीपी) उदय चव्हाण, मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक महेश पाटील, कॉर्पोरेट सीएसआर सल्लागार धनंजय खामकर, वरिष्ठ व्यवस्थापक सीएसआर हर्षला शिंदे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी (थळ) संतोष वझे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी (थळ) राकेश कवळे आदी उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **नामा धाया ठाकूर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 13237750334), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३९० खाते क्रमांक : २८६ | २ | ०.१८.७० पो.ख. ०.०२.५० | २.६९ |
| | | एकुण ०.२१.२० | |

**एकुण क्षेत्र ०.२१.२० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **आक्काबाई कमल पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID 21571601191), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३६/३७५ खाते क्रमांक : ८५३ | २ | ०.१५.४० पो.ख. ०.०२.३० | २.१९ |
| | | एकुण ०.१७.७० | |

**एकुण क्षेत्र ०.१७.७० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## ''नोटीस''

विषयः- **उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

संदर्भ :- अर्जदार सौ. रुबीना नईम खान (लग्नानंतरचे नाव) कु. रुबीना फारुख उलवावाला (लग्नापुर्वीचे नाव) रा.बी /१०४, सलमान कॉम्प्लेक्स, मुंब्रा देवी रोड, पटेल हाय विदयालय जवळ, जि.ठाणे यांचा दि.०९/१२/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार सौ. रुबीना नईम खान (लग्नानंतरचे नाव) कु. रुबीना फारुख उलवावाला (लग्नापुर्वीचे नाव) रा.बी /१०४, सलमान कॉम्प्लेक्स, मुंब्रा देवी रोड, पटेल हाय विदयालय जवळ, जि.ठाणे यांनी त्यांचे उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १४/१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भालेराव**
प्र. निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

पत्र.क्र.मशा/प्रशा-१/ उशिरा जन्म
नोंद नोटीस/२०२४/२८१/२०२४

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे- वांवजे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णण-**
**मौजे- वावंजे, ता-पनवेल, जि-रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| वावंजे | श्री. लक्ष्मण उंदऱ्या तांबडे<br>श्री. भरत उंदऱ्या तांबडे<br>श्रीमती. भिमाबाई शनिवार भगत<br>श्रीमती. ताईबाई रामचंद्र मढवी<br>श्रीमती. देवकीबाई हरिश्चंद्र पाटील<br>श्रीमती. अणुबाई रामचंद्र तांबडे<br>श्रीमती. सुचिता गणेश पाटील<br>श्रीमती. विशाखा विष्णू पाटील<br>श्री. नामदेव बामा तांबडे<br>श्रीमती. सुमनबाई विठ्ठल म्हात्रे<br>श्रीमती. कृष्णाबाई गणपत पाटील<br>श्रीमती. शंकुतला बाळकृष्ण घरत<br>श्रीमती. प्रेमाबाई भानुदास गोंधळी | १६१ | १ | १.८१.२० हे.आर.पॉ पैकी १.३५.९० हे.आर.पॉ | ४.०३ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक :** २४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
**पत्ता- शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६**

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

**जा.क्र. : कुबनप/उद्यान/१७४/२०२४-२५** **दिनांक :- २४/१२/२०२४**

### जाहीर ई-निविदा सूचना क्र. ३/२०२४-२५

कुळगांव बदलापूर नगरपरिषद जिल्हा-ठाणे यांजकडून खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्रमांक ३० मध्ये झाडाची खोडे पांढरा व गेरू पट्ट्या मध्ये रंगविणे. | रु.४,९८,२५८=०० | रु.५०००=०० | रु.५००=०० | ३० दिवस |

**सदर निविदेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.**
१) निविदा संच विक्री ठिकाण -उद्यान विभाग (निविदा विक्री व इसारा रक्कम) दिनांक -२५/१२/२०२४ ते दिनांक-१/१/२०२५ (सुट्टीचे दिवस वगळून)
२) निविदा धारकांनी निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक- २/१/२०२५
३) मा. मुख्याधिकारी कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे कार्यालयात दिनांक -३/१/२०२५ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत शक्य झाल्यास निविदा उघडण्यात येईल.

**निविदा फॉर्म प्राप्त करण्याच्या व भरण्याच्या अति व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे राहतील.**
अ) महाराष्ट्र शासनाचे बांधकाम विभाग अथवा सक्षम खात्याचे नोंदणी प्रमाणपत्र नोंदणी ठेकेदार
ब) आयकर विवरणपत्र, GST प्रमाणपत्र.
क) उपरोक्त कामाकरिता निविदा सादर करताना सर्व करासहित निविदा भरावी.
ड) कामाचे अनुभव प्रमाणपत्र
इ) निविदा संदर्भात सदस्यशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे परिशिष्ट अ प्रमाणे प्रतिज्ञापत्र
उ) शपथपत्र ५०० रु च्या स्टॅम्प पेपरवर
**४) वित्तीय बोलीचा लिफाफा क्रमांक २**
अ) मूळ प्रतीतील दरपत्रक
५) प्राप्त निविदा स्वीकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
६) वर नमूद केलेल्या कामाची साईट पाहणी करून निविदा भरावी व करारनाम्यातील सर्व अटी शर्तीचे व नगरपालिका नियम व अधिनियम यांचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**सही/-**
**( मारुती गायकवाड )**
**मुख्याधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगाव**

## जाहीर निविदा

ग्रामपंचायत वाघिवली ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्या करिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक २४/१२/२०२४ ते ३०/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | टेंडर फॉर्मची रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.जि.प. शाळा वाघिवली येथे शौचालय बांधणे | ७५७२४/- | ७५७/- | ५००/- | ३ महिने |
| २ | मौजे वाघिवली येथे स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | ६५९१६/- | ६५९/- | ५००/- | ३ महिने |
| ३ | मौजे वाघिवली येथे धोबीघाट करणे व सांडपाणी मुराविणे शोषखड्डा मारणे. | ८४५१०/- | ८४५/- | ५००/- | ३ महिने |
| ४ | रा.जि.प. शाळेस पाणीपुरवठा लाईन व वॉश बेसिंग काढणे. | ३४९३०/- | ३४९/- | ५००/- | ३ महिने |
| ५ | संगणक खरेदी करणे | ५००००/- | - | - | - |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**
१) वरील कामाच्या निविदा मोहरबंद पाकिटात मा. सरपंच ग्रामपंचायत वाघिवली यांचे नावे दिनांक ३०/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येईल.
२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ३१/१२/२०२४ रोजी १.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येईल.
५) कोणत्याही नामंजुर निविदेसंदर्भात ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६) सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत वाघिवली**
**ता. पनवेल, जि. रायगड.**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वाघिवली**
**ता. पनवेल, जि. रायगड.**

# तोतया पोलिसांची टोळी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून हॉटेलमध्ये बसलेल्या व्यक्तींना लुटणाऱ्या पाच जणांच्या टोळीला अवघ्या ४८ तासांत अटक करून कामोठे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. २१ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल झाला आणि २२ डिसेंबर रोजी रात्री या टोळीचा पर्दाफाश कामोठे पोलिसांनी केला आहे. मंगेश शेंडगे (वय ३१, रा. कल्याण) यांच्या फिर्यादीनंतर कामोठे पोलिसांनी या गुन्ह्याची उकल केली आहे.



विनय अमित सपकाळ (वय ३०), सुबोध सदाशिव धोत्रे (वय ४०), निलेश मनोहर माळी (वय ३९), योगेश कृष्णदेव तिवारी (वय ४०), प्रशांत प्रकाश जगताप (वय ३५) अशी अटक केलेल्या तोतया पोलिसांची नावे आहेत.

फिर्यादी व त्यांचे मित्र दुर्गाप्रसाद चौरसिया हे २१ डिसेंबरच्या रात्री कामोठे सेक्टर ३४ येथील एका बारमध्ये दारू पित बसले होते. दारू पीत असताना काही मिनिटांत त्यांच्या टेबलजवळ तीन अज्ञात आले आणि उभे राहिले, आणि स्वतःची ओळख ठाणे क्राईम ब्रांचचे पोलीस असल्याचे सांगून दोघांना बाहेर घेऊन गाडीमध्ये बसवले. त्यानंतर दुर्गाप्रसाद चौरसिया तुमच्यावर मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्याप्रकरणी तुम्हाला पोलीस ठाण्यात घेऊन चाललो आहे, असे सांगितले. सायन-पनवेल महामार्गावरून मुंबईच्या दिशेने घेऊन जाताना दुर्गाप्रसाद चौरसिया आणि फिर्यादी यांना गाडीत मारहाण करून गुन्ह्याची कबूल देण्याची मागणी तोतया पोलिस करू लागले. याच वेळी फिर्यादी साक्षीदार यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्याची धमकी तोतया पोलिसांनी साक्षीदार याला दिली, पोलिसांची धमकी ऐकून साक्षीदार याने पैसे घेऊन मॅटर मिटवण्याची विनंती केली.

या वेळी तोतया पोलिसांनी साक्षीदार याला स्टीलच्या स्टिकने मारहाण केली, आणि याच वेळी साक्षीदार याच्या एटीएमच्या माध्यमातून ९६ हजार रुपये काढून घेतले. आणि फिर्यादी आणि साक्षीदार याला वाशी रेल्वे स्टेशनवर सोडून तोतया पोलिसांच्या टोळीने वाशी येथून पळ काढला.

तक्रारीनंतर पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक आयुक्त अशोक रजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्हीची पाहणी करून पोलिसांना सफेद रंगाच्या स्कॉर्पिओचे फुटेज मिळविले. गाडीचा मालक पालघर येथील परिसरात असल्याचे समजले.

पोलीस निरीक्षक राकेश पगारे, पोलीस निरीक्षक प्रकाश तायडे आणि अन्य पोलीस पथकाने पालघर येथे धाव घेत आरोपींचा शोध सुरू केला. पोलिसांनी एका रिसॉर्टवर धाड मारून पाचही आरोपींना पालघर येथून अटक केली. चौकशीत एका आरोपीकडे सीबीआयचे ओळखपत्र मिळाले. तसेच पोलिसांची हातकडी, काठ्या त्यांच्याकडे आढळून आल्या. पुढील तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

# खारपाडा येथे मंत्री आदिती तटकरेंचे स्वागत; अभिनंदनाचा वर्षाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांचे पनवेल तालुक्यील तारा गावाजवळील खारपाडा नाका येथे जोरदार स्वागत करण्यात आले.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात श्रीवर्धन मतदारसंघाच्या आमदार आदिती तटकरे यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर झालेल्या खातेवाटपामध्ये त्यांना पुन्हा एकदा महिला व बालकल्याण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, त्या खारपाडा नाका आल्या असता त्यांची ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य संदीप मुंढे व राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्षा वासंबे सरपंच उमा मुंढे, भाजप नेते गणेश पाटील, भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, वर्षा पाटील, प्रमोद रायलकर, पांडूरंग पारंगे, नामदवे कोकबे, संतोष मांडे, कविता मांडे, विनया मांडे, स्वप्नाली महेद्रगिकर, शारदा काळे, गणेश मांडे, सागर पाटील, संतोष पाटील संदीप पाटील, नंदू कुरंगले, अमोल गीत, मंगेश खाने, दिपक इंगले, सागर सुखदरे, आपटा ग्रामपंचायतीचे सदस्य



असद पिठ्ठु, केळवणे पंचायत समिती युवा मोर्चा उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, प्रफुल पाटील, प्रशांत म्हात्रे, नरेश राजपूत, विनोद पवार, कमलाकर टाकले, राजन भोजने, ज्ञानेश्वर भोईर आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वच्छ आंध्र कॉर्पोरेशनतर्फे नवी मुंबईत घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास दौरा



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन अद्ययावत असून मलनि:स्सारण व्यवस्थापनातही नवी मुंबईने अत्याधुनिकता राखत स्वत:ची वैशिष्ट्यपूर्णता जपलेली आहे. या अनुषंगाने देशापरदेशातून विविध तज्ज्ञ तसेच अभ्यासक नवी मुंबई महापालिकेच्या विविध प्रकल्पांना भेटी देत असतात.

याच धर्तीवर आंध्रप्रदेश राज्यातील स्वच्छ आंध्र कॉर्पोरेशनच्या उच्च अधिकारीवर्ग अभ्यासगटाने नवी मुंबई महानगरपालिकेस भेट देत घनकचरा व मलनि:स्सारण व्यवस्थापनाची माहिती जाणून घेतली तसेच प्रत्यक्ष पाहणी केली आणि प्रणालीचे कौतुक केले.

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे स्वागत केले तसेच घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली. या अभ्यासगटातील वरिष्ठ पदाधिकारी के.पत्ताभिराम, स्वच्छ आंध्र कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक बी..अनिलकुमार रेड्डी, महापालिकाआयुक्त डी.दसरध रामी रेड्डी, उप कार्यकारी अभियंता के.सतीश कुमार, वॉश सल्लागार छ.भानुप्रकाश व एम. नागेश्वरा यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रणाली, निसर्गोद्यान, कोपरखैरणे येथील मलनि:स्सारण केंद्र व टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट तसेच वैशिष्टयपूर्ण आकांक्षी शौचालय आणि इटीसी केंद्र यांना भेटी देऊन प्रशंसा केली.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे व संतोष वारूळे, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची अभ्यास सहल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर



वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाने २१ डिसेंबर रोजी १०.०० वाजता वीर माता जिजाबाई भोसले उद्यानाला (भायखळा) भेट दिली.

या भेटीमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी अनेक सस्तन प्राणी, पक्षी आणि कीटक, वनस्पती-वैविध्य पाहिले व अनुभवले. भारतातील सर्वात मोठ्या वनस्पतिसंग्रहालयांपकी एक असलेल्या मुंबईतील 'ब्लाटर हर्बेरिअम'मध्ये राणीच्या बागेतील वनस्पतींचे ४६५ नमुने जतन केलेले आहेत.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी भेटीच्या आयोजन केले बद्दल आयोजकांचे अभिनंदन केले पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा. या भेटीचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# २३ आठवड्यांच्या बाळावर यशस्वी उपचार

**पनवेल : वार्ताहर**

खारघरच्या मदरहुड हॉस्पिटल्समध्ये मुदतपूर्व प्रसूतीनंतर केवळ सहाशे ग्रॅम वजनाच्या बाळाचा जन्म झाला. २३ आठवड्यातच जन्म झालेला असल्याने त्याच्या फुफ्फुस आणि हृदयाची वाढ पूर्णपणे झालेली नव्हती. त्यामुळे बाळाची प्रकृती चिंताजनक होती. अशा सर्व प्रतिकूल स्थितीवर मात करीत चिमुकल्याने रुग्णालयात शंभर दिवस एनआयसीयुत जगण्यासाठी संघर्ष केला.

डॉ. प्रतिमा थमके (स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ, मदरहुड हॉस्पिटल, खारघर) डॉ. अनिश पिल्लई(बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ), डॉ. संजू सिदाराद्दी (बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ) आणि डॉ. अमित घावडे (बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ) यांच्या मार्गदर्शनाखाली या बाळावर यशस्वी उपचार केले. अखेर १०० दिवसानंतर २.२ किलो वजनाचा टप्पा गाठल्यानंतर या बाळाला घरी सोडण्यात आले.

बाळाचे वडिल सांगतात की, आम्हाला संपूर्ण टिमकडून मिळालेले प्रेम आणि आपुलकी खरोखरच हृदयस्पर्शी होती. आम्ही सर्व तज्ञांचे मनापासून आभारी आहोत, त्यांच्यामुळेच आमच्या बाळाला आता नवे आयुष्य मिळाले आहे.

# नील हॉस्पिटल येथे जागतिक ध्यान दिवस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिएसआरफ ट्रस्ट द्वारा, नील हॉस्पिटल येथे रविवारी (दि.२२) पहिला जागतिक ध्यान दिवस व गर्भसंस्कार शिबिर मोठ्या उत्साहात झाले.

प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर व गर्भ संस्कार तज्ञ डॉ. शुभदा नील यांनी गर्भवती महिलांना आहार, व्यायाम, प्राणायाम, मेडिटेशन, नॉर्मल डिलिव्हरी व



इतर विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. गर्भसंस्कारामुळे बाळ सुसंस्कारी, ज्ञानवान, सर्व गुणांनी संपन्न, शक्तीशाली, चरित्रवान, बुद्धिवान होण्यास मदत होते.

ध्यान केल्याने गर्भवती माता खुश आणि स्वस्थ राहतात व येणारे बाळ खुश व स्वस्थ होते. नील हॉस्पिटल येथे दर महिन्याला असे एक दिवसीय गर्भसंस्कार शिबिर मोफत आयोजित करण्यात येते, तरी जास्तीत जास्ती गर्भवती महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. नील यांनी केले आहे.

# वाशी येथे राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग नवी मुंबईच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन वाशी येथे साजरा करण्यात आला. या वेळी नागरिकांना ग्राहक हक्क आणि वस्तूंवरील वजन बाबत प्रबोधन माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी २४ डिसेम्बर हा दिवस राष्ट्रीय



ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकाटे, मापे, आवेष्ठित वस्तू उत्पादनांवरील आवश्यक माहिती इ. बद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली. तसेच ग्राहक जनजागृती माहितीपत्रके वाटण्यात आली.

या वेळी वैध मापन शास्त्र यंत्रणा उपनियंत्रक, ठाणे जिल्हा क्रमांक २ सुहास कुटे यांचे मार्गदर्शनाखाली वाशी १ आणि ४ विभागाचे निरीक्षक एम. एच तडवी वाशी २ विभागाचे निरीक्षक हेमंत कुलथे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्र सहा. अनंत पाडवी, रमाकांत गाडेकर यांनी परिश्रम घेतले.

# सीकेटीचे विशेष श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

## शांतीवन, नेरे येथे यशस्वी आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिजिटल साक्षरता आणि आजचा युवक ह्या विषयावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १५ ते २१ डिसेंबर २०२४दरम्यान कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, नेरे, तालुका पनवेल याठिकाणी सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

१५ डिसेंबर रोजी सायंकाळी ०५ वाजता शिबिराच्या उद्घाटन समारंभाला पनवेलचे निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार आणि नायब तहसीलदार विनोद लचके, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, नेरेचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती राहिली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.सुर्यकांत परकाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समाजकेंद्री उपक्रमांचा मागोवा घेतला.

आभार आर.टी.सी.सी.एस. महाविद्यालयाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले व सूत्रसंचालन सीकेटी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील यांनी केले. या वेळी व्यासपीठावर निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार, नायब तहसीलदार विनोद लचके, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, खारघरच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, सीकेटी महाविद्यालयाच्या मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी.एस. पाटील, वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो.डॉ. एस.बी.यादव, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे नियंत्रक प्रो. डॉ. एस. आय. उन्हाळे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पहिले प्रकल्प अधिकारी डॉ. डी. एस. नारखेडे, माजी मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. सी. वडनेरे, माजी कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. ए. के. दीक्षित, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर आदी उपस्थित होते.

उद्घाटन समारंभानंतर स्वयंसेवकांचे विविध संघांमध्ये विभाजन करण्यात आले व प्रत्येक संघासाठी एक स्वयंसेवक आणि एक स्वयंसेवीकेची संघनायक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

शिबिरास १६ डिसेंबरपासून सुरुवात झाली, पहिले बौद्धिक सत्र डॉ. विशाल गांगर यांनी मानसिक आरोग्य व त्याचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. १७ डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांचा चमुने शांतीवन नेरे परिसर येथे बंधारा बांधण्याच्या उपक्रमाला सुरुवात केली. तथा वाकडी ग्रामपंचायत परिक्षेत्रात स्वच्छता अभियानाचे आयोजन करून गावकरी मंडळींमध्ये कर्करोग तपासणीचे शिबिराची माहिती प्रसारित केली. प्रसिद्ध कीर्तनकार श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी अध्यात्म म्हणजे दैववाद



नसून माणसाला माणसाप्रमाणे वागणूक देणे म्हणजे खरे अध्यात्म होय, असे प्रतिपादन केले.

स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या चमूने १८ डिसेंबर रोजी नियोजनबद्ध पद्धतीने वाकडी येथील अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आदिवसी शाळेत जावून शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरतेबाबत जनजागृती केली. डॉ. सलील पाटकर यांनी मार्गदर्शन केले. विशाल मानकामे यांनी सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांचा चमुने १९ डिसेंबर रोजी स्वच्छता आणि प्लास्टिक बंदी बाबत भव्य रॅलीचे आयोजन केले. रॅलीचे ग्रामपंचायत नेरेचे सरपंच प्रकाश घाडगे, ग्रामसेविका राजश्री पाटील व कर्मचारीवर्गाने स्वागत केले. रॅलीनंतर स्वयंसेवकांनी नेरे प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात स्वच्छता मोहित यशस्वीपणे राबविली.

याबरोबर दुसऱ्या चमूने भैरवदेव माध्यमिक विद्यालय आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. भूपेंद्र गायकवाड यांनी सर्व उपस्थित स्वयंसेवकांसाठी आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले. सीकेटी महाविद्यालाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने कलादर्पण सांस्कृतिक संध्येचे आयोजन करत वेदना सातारकर, हजर सर या एकांकिकेचा सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर, सांस्कृतिक समन्वयक प्रा. गणेश जगताप आणि त्यांच्या चमुने अद्वितीय सादरीकरण केले.

२० डिसेंबर २०२४ रोजी वाकडी गावात ब्रेस्ट कॅन्सरचा संभाव्य धोका टाळण्यासाठी आवश्यक असणारी मॅमोग्राफी चे शिबीर वाकडी ग्रामपंचायतच्या सरपंच कुंदा. पवार यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले. सुशीला साबळे (कचरावेचक ते पर्यावरणरक्षक) यांनी पर्यावरण संधारणाचे महत्व उधृत केले. भारुड या लोककलेच्या माध्यमातून अनिल केंगार यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

शिबिराचा समारोप समारंभ २१ डिसेंबर रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली तथा पनवेल महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रुपाली माने यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. राष्ट्रीय योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे यांनी उपस्थितांसमोर सात दिवसांचा आढावा घेतला.

कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरेचे कार्याध्यक्ष श्री. प्रमोद ठाकूर, प्रमुख कार्यवाहक विनायक शिंदे, कार्यवाहक नीलकंठ कोळी आदींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आभार मानून महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलम मोरे यांनी कार्यक्रमाची सांगता केली. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील यांनी केले.

शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. रुपाली पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. पूजा दांदळे, एन.एस. एस. विषयक शिक्षक प्रा. रुपेश माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

### विशेष कामगिरी करणाऱ्या स्वयंसेवकांचा गौरव

सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिरात विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्वयंसेवकांना प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून समाधान साळवी आणि साक्षी धनावडे तथा सर्वोत्कृष्ट नेतृत्व म्हणून अनिकेत मोरे आणि साशा वायंगणकर यांची नावे जाहीर केली व त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याबरोबर शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गात रोशन रोडपालकर, मिलिंद पाटील, शशिकांत घनसोळकर, स्वप्नील लिंगायत यांचा सत्कार केला.




# 'मएसो'मध्ये 'स्वर संध्या'

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्या मंदिर बेलापूर येथील शाळेत रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्वर संध्या कार्यक्रम झाला. या वेळी प्रमुख अतिथी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी नियामक मंडळाचे सदस्य व शाळा समिती अध्यक्ष सागर नेवसे व विशेष कार्यकारी अधिकारी सचिन अंबर्डेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी प्रतिभाशाली गायक मराठी इंडियन आयडल विजेते सागर म्हात्रे व गायिका सा रे ग म प मराठी लिटिल चॅम्प विजेती गौरी गोसावी व आयोजक उत्सव नात्यांचा फेम अमोल पालेकर यांनी संगीताच्या कार्यक्रमास त्यांना साथ देणारे निवेदक व टीव्ही चॅनेलवर काम करणारी संपूर्ण टीमने अप्रतिम सादरीकरण केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे विद्या मंदिर शाळेचे संपूर्ण शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, पालक यांच्या अथक प्रयत्नाने हे रौप्य महोत्सवी वर्ष दिमाखात पार पडले.

# रोह्यात ना. आदिती तटकरे यांचे स्वागत





## ग्रामदेव श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतले दर्शन

**रोहे: प्रतिनिधी**

ना. आदिती तटकरे यांची कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्यानंतर पहिल्यांदाच रोहा तालुक्यात आल्यानंतर त्यांचे रोहा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले . यावेळी लाडक्या बहिणी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. महायुतीतील घटकपक्षांनीही अदिती तटकरे यांचा सत्कार केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर नव्या राज्याच्या मंत्रिमंडळात आदिती तटकरे यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाली. त्यांना महिला व बालकल्याण मंत्री पद देण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला होता. कॅबिनेट मंत्री पदी निवड झाल्यावर पहिल्यांदाच रोहा तालुक्यात येत असल्याने तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून आला.

रोहा तालुक्यातील नागोठणे, आंबेवाडी येथे त्यांचा जल्लोषात स्वागत केल्यानंतर रोहा शहरातील दमखाडी येथे मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी त्यांचे जल्लोषात फटाक्यांची आतिषबाजी, ढोल ताशाचा गजरात ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. त्यांचा रोहेकरांच्यावतीने सत्कार करण्यात आला.रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे नामदार आदिती तटकरे यांनी दर्शन घेतले.

यावेळी राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा कापरे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, मयूर दिवेकर, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, महिला अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, निलेश शिर्के, चंद्रकांत पार्टे, मयूर पायगुडे, राकेश जैन, विलास गुजर, विभा चोरगे, स्वप्निल धनावडे, स्वरांजली शिर्के आदी उपस्थित होते.

# अलिबाग जिल्हा रुग्णालयात ज्येष्ठांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिकांसाठी (महिला व पुरुष) दि. २६, २७ आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड-अलिबाग येथे सकाळी ०९.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले असून सर्वांनी शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक,डॉ.अंबादास देवमाने यांनी केले आहे.



या शिबिरामध्ये मेडिसीन विभाग-उच्च रक्तदाब, मधुमेह, पक्षाघात तपासणी व उपचार, हृदयरोग, डोळ्यांची तपासणी-डोळ्यांचे आजार व मोतिबिंदू चेकअप, मोफत चष्मे वाटप, स्त्रीरोग तपासणी-महिलांचे आजार, स्तन कर्करोग व गर्भाशयमुख कर्करोग तपासणी, नाक,कान, घसा तपासणी- एछ्ढ तपासणी व शस्त्रक्रिया, गरजेनुसार एन्डोस्कोपीद्वारे कानाची श्रवण वाटप, ऑर्थो पेडिक- चेकअप, एक्स-रे, फिजिओथेरपि सुविधा, दंत विभाग- मुख आरोग्य तपासणी, दातांचे आजार, कवळी बसवणे, सर्जरी- हर्निया, हायड्रोसिल तपासणी व शस्त्रक्रिया, मानसिक- मानसिक आजार तपासणी, उपचार व तपासणी,

आयुष-पंचकर्म, आयुर्वेद उपचार, समुपदेशन, आभाकार्ड-मोफत आभाकार्ड काढून दिले जाईल तसेच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यकतेनुसार रक्ताच्या चाचण्या मोफत केल्या जातील.

# नैसर्गिक साधन संपत्तीतूनच शेतकऱ्यांचे स्थैर्य उंचावेल !

## पोस्को शेतकरी संवादातून डॉ. देवधरांचा विश्वास

माणगाव : प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी आर्थिक स्थैर्य वाढविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तिकडे पाहण्याची आणि सोबतच उपजीविका उपक्रमांबद्दल असलेली कृतीशील धोरणांची अंमलबजावणी करणे काळाची गरज असल्याचे डॉ. प्रसाद देवधर यांनी विळे - भागाड औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आयोजित केलेल्या माध्यम संवाद आणि शेतकरी मार्गदर्शन सत्रात बोलताना व्यक्त केला.



विळे - भागाड औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने पोस्को कंपनीमध्ये (दि.२०) डिसेंबर रोजी चौथे त्रैमासिक माध्यम संवाद आणि शेतकरी मार्गदर्शन सत्र आयोजित केले होते.यावेळी प्रमुख वक्ते भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रसाद देवधरे. भगिरथ ग्रामविकास प्रतिष्ठानने गेल्या दोन पेक्षाही अधिक दशके सातत्य पूर्ण काम करत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कृषी, ग्रामीण विकास आणि संबंधित क्षेत्रात भरीव काम करून दाखविले आहे. त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी प्रसिद्ध असलेले डॉ. देवधर यांनी त्यांच्या यशस्वी प्रकल्पाच्या विविध आयामांबद्दल अनमोल माहिती सांगितली.

भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान मार्फत ९,००० हून अधिक बायोगॅस बांधले आहेत, ३५० कुक्कुटपालक शेतकरी, ३०० एकरावर सिंचन सुविधा, बचत गट व अनेकांना रोजगार उपलब्धी, युवक कल्याण, बालविकास व महिला सक्षमीकरणाचे कार्य, अंड्याचे गाव वाडोस येथे समूह शेतकरी विकासातून दरमहा १ लाख अंडी तयार होतात, २० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रकल्पामाध्ये सहाय्यकारी संस्था म्हणून काम केले. असे अनेक उपक्रम सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबवले जात असल्यची माहिती डॉ. देवधर यांनी दिली.

शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीकडे पाहण्याची आणि सोबतच उपजीविका उपक्रमांबद्दल असलेली कृतीशील धोरणे फारच महत्वाची आहेत. शाश्वत ग्रामीण आनंदमयी ग्रामीण जीवन अशी कल्पना विरळ होत असतानाही सुयोग्य सामूहिक प्रयत्नांतून बऱ्याच गोष्टी शक्य आहेत मात्र काही जणांनी एकत्र येवून पुढाकार घेण्याची गरज असते. आपण सगळ्यांनी वेळात वेळ काढून भगिरथला या असा आग्रहही डॉ. देवधर यांनी व्यक्त केला.

पोस्कोचे उपव्यवस्थापकीय संचालक ईन क्यो बे, यांनी त्यांच्या भाषणात पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या कल्याणकरी उपक्रम आणि आसपासच्या विकासासाठी दृढ वचनबद्धतेची पुष्टी केली. कार्यक्रमाला २० पत्रकार आणि ५१ शेतकऱ्यांसह (महीला - पुरुष) एकूण ७१ उपस्थितांचा सहभाग होता.

# त्रिरत्न बहुजन सेवा संघातर्फे आरोग्य शिबिर



**माणगाव : बातमीदार**

त्रिरत्न बहुजन सेवा संघ तळाशेत (इंदापूर) यांच्या तर्फे शुक्रवारी (दि.२२) आरोग्य शिबिर घेण्यात आले. या वेळी मोफत औषधे वाटपही करण्यात आली.

या वेळी मेंदूचे आजार, मणक्याचे आजार, मानसिक विकार, हृदयविकार या आजारांची लक्षणे असलेल्या शंभर ते दिडशे रूग्णाची या वेळी तपासणी करून त्यांना योग्य प्रकारे औषध देण्यात आली. रूग्णांची तपासणी करण्यासाठी सुरज हॉस्पिटल सानपाडा नवी मुंबई येथील प्रख्यात हृदयविकार तज्ञ डॉ. उदय पाटील हे आले होते. शिबिरात तपासणी ई.सी.जी.,एक्से-रे,ब्लड शुगर,ब्लड प्रेशर तपासणी, ऑडिमेट्री टेस्ट करण्यात आली. रूग्ण आढल्यास त्यांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत हृदय विकार, डायलेसिस व इंटरव्हेशनल रेडिओलॉजी यांचे मोफत उपचार तसेच कार्ड धारकासाठी आणि इन्शुरन्स पॉलिसी धारका करीता कॅशलेस उपचार सुविधा देण्यात येणार आहेत.

या आरोग्य शिबीराचे उद्घाटन माणगांवमधील प्रख्यात सर्जन डॉ.एस.एस.निकम, या वेळी बालरोग तज्ञ् डॉ.आबासाहेब पाटणकर,एम बी.बी.एस डॉ. कुणाल मनवर हे उपस्थित होते. हे आरोग्य शिबिर डॉ.आदेश घोणे यांचे मल्टि स्पेशालिटी क्लिनिक येथे आयोजित करण्यात आले होते.

# माउंट कार्मेल हायस्कूल येथे ख्रिस्त जन्मोत्सव साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील कोरलाई येथे ख्रिचन समाजाची माउंट कार्मेल हायस्कूल मध्ये ख्रिस्त जन्मोत्सव म्हणजे नाताळ साजरा करण्यात आला.इयत्ता पहिली ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी नाताळ निमित ख्रिस्त येशूचां जन्म यावर आधारित एक उत्तम नाटिका सादर करून व शांताक्लॉजच्या माध्यमातून ख्रिस्त जन्मोत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.या निमित्ताने सर्व उपस्थित मान्यवर यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी विविध ख्रिचन समाजातील विविध पारंपरिक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेचे चेअरमन बोनोवेंचर नुनीस यांनी आपल्या मार्गदर्शन भाषणात सांगितले की, आज समाजाला शांती आवश्यक आहे.शांतीचा संदेश घेऊन येशू आले व संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे कार्य केले आहे.संपूर्ण जगाला आज शांततेची गरज आहे.त्यापैकीच ख्रिसमस म्हणजेच शांतीचे प्रतीक आहे.

ख्रिसमस शांतीचे प्रतीक असून भगवान येशू ख्रिस्ताने शांततेचा संदेश देऊन समता व बंधुभाव याचा संदेश दिला असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.सर्व मुलांनी खूप मेहनत घेतली व विविध सांस्कृतिक कार्यक्रम करून घेतले.सर्व शिक्षक वृंद यांनी मेहनत घेऊन ऐक चांगला कार्यक्रम साजरा केला.मेहनत घेऊन अतिशय उत्कृष्ठ कार्यक्रम साजरा करण्यात आला.कोणतेही यश मिळवण्यासाठी सर्वांचे सहकार्य खूप आवश्यक असते.असे यावेळी बोनावेंचर नुनिस यांनी आपले विचार व्यक्त केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका ज्युली चांदी यांनी सांगितले की,भगवान येशू ख्रिस्तानी शांतीचा संदेश दिला. समाजातील दीन दुबळ्या लोकांना न्याय मिळवून देऊन भक्तीमध्ये विलीन केले.यावेळी शाळेतून इयत्ता पहिली ते दहावी मध्ये सर्वोत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. आदिवासी विद्यार्थी यांचा सुधा सन्मान करण्यात आला.सदरील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.






# विद्यार्थ्यांनी स्वत:ची ओळख निर्माण करावी -विश्वनाथ पाटील

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी कोणते क्षेत्र निवडले तरी त्या क्षेत्रात नेहमी सातत्य ठेवणे गरजेचे आहे. कोणत्या खेळात स्वतःला झोकून देत त्यातून आपली स्वतःची ओळख निर्माण करा, असा सल्ला राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व प्रशिक्षक विश्वनाथ पाटील यांनी सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभा प्रसंगी दिला

विद्याप्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख अतिथी, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व प्रशिक्षक विश्वनाथ रामचंद्र पाटील यांच्या शुभहस्ते व संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पाहुण्यांचे स्वागत लेझीम व ढोल ताशांच्या गजरात करण्यात आले. यावेळी आरएसपी पथकाने शिस्तबद्ध संचालनातून पाहुण्यांना मानवंदना दिली.

प्राथमिक व माध्यमिक विभागातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले उत्कृष्ट खेळाडू ऋषी जोमा भस्मा, उत्कृष्ट खेळाडू दीपिका जयवंत डुकरे यांचे विशेष कौतुक करत दोन्ही चॅम्पियन खेळाडूंना वैयक्तिक ५०० रुपयाचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

त्याचबरोबर प्रमुख अतिथींनी आहाराविषयक मार्गदर्शन केले. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष अविनाशजी देशमुख, कार्याध्यक्ष शोभाताई देशमुख, संचालिका तथा प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड, रायगड जिल्हा कबड्डी संघाचे माजी कर्णधार दिनेश पाटील, शाळेच्या उपमुख्याध्यापिका पुजारी मॅडम, पर्यवेक्षक मोळीकर प्राथमिकचे समन्वयक कांबळे, शिक्षिका प्रतिनिधी सुवर्णा मोरे , विद्यार्थी प्रतिनिधी व्यासपीठावर उपस्थित होते.

# महात्मा एज्युकेशन सोसायटीतर्फे फिट इंडिया वीक

**मोहपाडा : प्रतिनिधी**

एचओसी इंटरनॅशनल स्कूल, रसायनी येथील भव्य मैदानावर सोमवारी (दि. २३) रोजी 'फिट इंडिया वीक' चे आयोजन करण्यात आले होते.या क्रीडास्पर्धेचे उद्घाटन आयआरएस असोसिएटच्या रिजनल डायरेक्टर पूर्वा मंदा यांच्याहस्ते करण्यात आले.

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने मीट द चॅम्पियन नावाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भारतीय क्रीडा प्राधिकरणाने ॲथलेटिक्स आणि व्हॉलीबॉलसाठी विस्तार योजना नावाच्या क्रीडा प्रोत्साहन योजनेअंतर्गत रसायनी मोहोपाडा येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसी इंटरनॅशनल स्कूल, रसायनी हे केंद्र म्हणून दत्तक घेतले आहे.

याठिकाणी भारताचे सचिन एस खिलारी (पॅरा ऑलिम्पिक २०२४ रौप्य पदक विजेता



(शॉट पुट) एचओसी इंटरनॅशनल स्कूलच्या नवोदित खेळाडूंशी संवाद साधला. यावेळी एच.ओ.सी.एल स्कूलच्या क्रीडा दिवस २०२४-२५ च्या अंतिम दिवशी एचओसी इंटरनॅशनल स्कूलच्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा पूर्वा मंदा यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

या वेळी ऋषभदास (एशियन चॅम्पियन गोल्ड आणि सिल्वर मेडल स्विमिंग),पदमशन पद्मनाभन (स्पोर्ट डायरेक्टर महात्मा एज्युकेशन सोसायटी), डॉ.निवेदीता श्रेयांश(सिईओ पिल्लई एज्युकेशन), मुख्याध्यापक जगदीश बाकल, मुख्याध्यापक रिमा निकालजे(महात्मा एज्युकेशन एचओसी), पाटील आदी मान्यवरांसह शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ना. गोगावले यांचे पोलादपूर येथे जंगी स्वागत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आ.भरतशेठ गोगावले मंत्री झाल्यावर नागपूर येथून हवाईमार्गे मुंबई आणि तेथून मोटारीने मतदार संघाचा प्रवास करताना ठिकठिकाणी जनतेचे ऋण व्यक्त करीत स्वागत शुभेच्छा स्विकारीत मध्यरात्रीच्या सुमारास पोलादपूर या शेवटच्या थांब्यावर ना.भरतशेठ गोगावले यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

सर्वात लहान दिवस २२ डिसेंबर हा असल्याने पोलादपूर शहरात लवकरच काळोखाचे आणि थंडीचे साम्राज्य पसरले असताना नामदार भरतशेठ गोगावले महाडकडून पोलादपूरकडे निघाल्याचा संदेश आला आणि छ.शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळयाच्या परिसरातील स्टेजभोवती उत्साही कार्यकर्त्यांची गर्दी जमली.




नगरपंचायत पोलादपूरतर्फे नामदार भरतशेठ गोगावले यांचा चंदेरी गदा आणि शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, मनोज प्रजापती, विनायक दिक्षित, सिध्देश शेठ, प्रसाद इंगवले, माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, नगरसेविका स्नेहल मेहता,अस्मिता पवार, शिल्पा दरेकर, शहरप्रमुख तथा स्वीकृत नगरसेवक सुरेश पवार यांनी भव्य सत्कार केला.

यावेळी माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृउबा सभापती लक्ष्मण मोरे, नायक मराठा समाज अध्यक्ष सुनील मोरे, शिवसैनिक दशरथ उतेकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी सरपंच वैशाली भुतकर ,ज्योत्स्ना केसरकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून ना.भरतशेठ गोगावले यांचा सत्कार व स्वागत करण्यात आले. यावेळी मनसे शहरअध्यक्ष दर्पण दरेकर, नंदीवाले, हमाल पंचायत, व्यापारी असोसिएशन तसेच युवासेना आणि अन्य संघटनांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली.

# अंडर १९ वर्ल्डकपसाठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. आगामी अंडर १९ वूमन्स टी २० वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे.

बीसीसीआय निवड समितीने मुख्य संघात १५ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. तर ३ खेळाडूंना राखीव म्हणून संधी देण्यात आली आहे. निकी प्रसाद भारतीय अंडर १९ महिला संघाचं नेतृत्व करणार आहे. तर मुंबईकर सानिका चाळके हीच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी असणार आहे. वूमन्स टीम इंडियाने रविवारी २२ डिसेंबरला बांगलादेशचा धुव्वा उडवत पहिल्यावहिल्या अंडर १९ आशिया कपवर नाव कोरले. त्यामुळे आता या महिला ब्रिगेडकडून आगामी टी २० वर्ल्ड कप स्पर्धेत अशाच कामगिरीची अपेक्षा असणार आहे.

या वूमन्स अंडर १९ वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेत एकूण १६ संघ सहभागी होणार आहेत. या १६ संघांना ४-४ नुसार ४ गटात विभागण्यात आले आहे. टीम इंडियासह विंडीज, यजमान मलेशिया आणि श्रीलंका हे ४ संघ ए ग्रुपमध्ये आहेत. टीम इंडिया वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात १९ जानेवारीला विंडीजविरूद्धच्या सामन्याने करणार आहे. त्यानंतर २१ जानेवारीला मलेशियाविरुद्ध सामना होईल. तर टीम इंडिया साखळी फेरीतील तिसरा आणि शेवटचा सामना हा २३ जानेवारीला श्रीलंकेविरुद्ध खेळेल.

## मुंबईकर खेळाडूकडे मोठी जबाबदारी



### स्पर्धेचे नियम

प्रत्येक गटातील पहिले ३ संघ सुपर ६ सिक्ससाठी पात्र ठरतील. सुपर ६ फेरीतील सामन्यांचे आयोजन हे २५ ते २९ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. सुपर ६ फेरीसाठी ६-६ नुसार २ गट असतील. सुपर ६ मधून दोन्ही गटातून अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. उपांत्य फेरीतील सामने हे ३१ जानेवारीला होतील. तर २ फेब्रुवारीला विश्व विजेता संघ निश्चित होईल.

### टीम इंडियाच्या सामन्यांचं वेळापत्रक

- इंडिया विरुद्ध विंडीज, १९ जानेवारी (मलेशिया)
- इंडिया विरुद्ध मलेशिया, २१ जानेवारी (मलेशिया)
- इंडिया विरुद्ध श्रीलंका, २३ जानेवारी, (मलेशिया)

### वूमन्स अंडर १९ वर्ल्ड कपसाठी टीम इंडिया

निकी प्रसाद (कर्णधार), सानिका चाळके (उपकर्णधार), जी त्रिशा, कमलिनी जी (विकेटकीपर), भाविका अहिरे (विकेटकीपर), ईश्वरी अवसरे, मिथिला विनोद, जोशिता व्हीजे, सोनम यादव, पारुनिका सिसोदिया, केसरी धृती, आयुषी शुक्ला, आनंदिता किशोर, एमडी शबनम आणि वैष्णवी एस.

स्टँडबाय खेळाडू : नंदना एस, इरा जे आणि अनादी टी.

# सोनखार स्पोर्ट्स फेस्टिवलचे पारितोषिक वितरण



**नवी मुंबई : बातमीदार**

सोनखार स्पोर्ट्स फेस्टिवल सानपाडा-पाम बीच येथे मोठया उत्साहात झाला. सलग सहाव्या वर्षी झालेल्या या स्पर्धेत २०हून अधिक क्रीडा स्पर्धात सुमारे साडेचार हजार स्पर्धक सहभागी झाले होते.

> मोबाईल व इंटरनेटच्या विळख्यातून बाहेर पडून मोबाईल छोडो मैदान जोडो..! या घोषणेसह सानपाडामधील क्रीडा प्रेमी स्पर्धेत सहभागी झाले होते. आपले मन अधिक प्रफुलीत व्हावे, सर्वच वयोगटातील नागरिकांना जीवनाची प्रेरणा मिळावी, आरोग्य अधिक समृद्ध व्हावे हा फेस्टिवल साजरा करण्याचा उद्देश होता.
> **-दशरथ भगत, आयोजक**

सानपाडा-पामबीच येथील क्रीडा प्रेमिच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी १९ ते २२ डिसेंबर २०२४ दरम्यान सोनखार स्पोर्ट्स फेस्टिवल आयोजित करण्यात आला होता. या मध्ये विविध २० क्रीडा स्पर्धांसह आरोग्य व कलात्मक गुणांना वाव देणारे उपक्रम फेस्टिवल मध्ये माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. या फेस्टिवलचे यशस्वी नियोजन निशांत भगत व संदीप भगत यांनी केले. संपूर्ण स्पर्धेच्या संयोजनात प्रत्येक खेळाचे अनुभवी समन्वयक यांच्यासह नाखवा सिताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळ व सोनखार -पामबीच जेष्ठ नागरिक सेवा समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

स्पर्धेतील सर्व विजेत्यांना माजी नगरसेविका वैजयंती भगत व रुपाली भगत यांच्यासह विविध सोसायटींचे पदाधिकारी यांच्या हस्ते पारितोषिक, प्रशस्तीपत्र, ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी ख्रिसमस सेलिब्रेशन व नूतन वर्षाचे स्वागत बच्चे कंपनी सह केक कापून व आकाशात फुगे सोडून करण्यात आले.

# तिसरी मर्दानी स्पोर्ट्स राष्ट्रीय स्पर्धा उत्साहात




**जळगाव : प्रतिनिधी**

तिसरी मर्दानी स्पोर्ट्स राष्ट्रीय स्पर्धा जळगाव येथे २०ते २२ डिसेंबर रोजी झाली. या स्पर्धेत १६ राज्यातून ३७८ खेळाडूंनी भाग घेतला होता. कार्यक्रमाच्या उद्घाटक केंद्रीय क्रीडा मंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जळगावच्या माजी महापौर सीमाताई भोळे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी दाखवण्यात आलेल्या चित्त थरायक प्रात्यक्षिक वेळी मंत्री महोदयाने या खेळाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाचा दर्जा मिळण्याचे आश्वासन दिले. उपस्थित संघटनेचे साउथ एशिया अध्यक्ष मंदार पनवेलकर, राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप सिंग, राष्ट्रीय महासचिव संतोष खंदारे, राज्य अध्यक्ष प्रशांत मोहिते व सचिव विनोद कुंजीर तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# विनोद कांबळीवर होणार मोफत उपचार



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा माजी क्रिकेटर विनोद कांबळी सध्या ठाण्याच्या आकृती रुग्णालयात उपचार घेत आहे.

आकृती रुग्णालयाचे डॉ. विवेक त्रिवेदी यांनी विनोद कांबळीबद्दल एक मोठ वक्तव्य केले आहे.

डॉ. विवेक त्रिवेदी यांनी सांगितले की, कांबळीच्या प्रकृतीवर आम्ही लक्ष ठेऊन आहोत. टीम मंगळवारी आणखी काही त्याच्या तपासण्या करेल. त्यांनी सांगितले की, आकृती रुग्णालयाचे प्रभारी एस सिंह यांनी आपल्या रुग्णालयात आयुष्यभर कांबळीवर मोफत उपचार करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे कांबळीला आता उपचारासाठी पैशांच्या समस्यांचा सामना करावा लागणार नाही. मोफत उपचार त्याला आयुष्यभर मिळतील. कांबळीला त्याचा एक चाहता उपचारासाठी रुग्णालयात घेऊन आला. हा चाहताच रुग्णालयाचा मालक आहे.

# उरण नागावमधील मोहीत म्हात्रेला जलतरण क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील नागाव मध्ये राहणारा मोहीत संदीप म्हात्रे याने २४ ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान गुजरात येथील राजकोटमध्ये पार पडलेल्या ६८ व्या राष्ट्रीय शालेय जलतरण क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रौप्यपदक जिंकून उरण, रायगड आणि महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे.



या यशाबद्दल उरणचे आमदार महेश बालदी यांनी मोहित म्हात्रेचे कौतुक करून त्याचे अभिनंदन केले तसेच ताफ्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. उरणमधून मोहीत म्हात्रे हा जलतरणात राष्ट्रीय पातळीवर पदक जिंकणारा पहिला खेळाडू आहे. तसेच राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत तीन ऐतिहासिक सुवर्णपदके जिंकणारा उरणचा पहिला खेळाडू ठरला आहे.

आता राष्ट्रीय स्तरावर रौप्य पदक पटकावत त्याने आपले नाव अधिक चमकवले आहे. या वेळी भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शहा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला कुस्तीमध्ये चार सुवर्ण, एक रौप्यपदक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने रविवारी (दि. २२) पनवेल तालुका कुस्ती असोसिएशन आयोजित कुस्ती स्पर्धेत चार सुवर्ण व एक रौप्यपदक पटकावली आहेत.

महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील प्रथम वर्षाच्या सानिया शेख हिने सुवर्ण, भावना सिंग हिने रौप्य; मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रथम वर्षाचा सिद्धेश खडकर याने सुवर्ण, अकाउंट फायनान्स विभागातील तृतीय वर्षाचा विशाल पुजारी याने सुवर्ण आणि विज्ञान शाखेतील प्रथम वर्षाचा शिवकुमार साहू याने सुवर्णपदकावर नाव कोरले. या खेळाडूंना जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर व फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत, रवींद्र शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी संचालक आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे संचालक व माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# लाठी काठी खेळाचा दापोलीत विश्वविक्रम

## उलवेतील वॉरियर्स क्लबच्या चार खेळाडूंचाही समावेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लाठी काठी या महाराष्ट्राच्या मातीतल्या शिवकालीन पारंपरिक खेळाचा विश्वविक्रम रविवारी (दि.२२) रोजी ७४ स्पर्धकांनी केला. दापोली (जि. रत्नागिरी) येथे सलग एक तास एक मिनिट व एक सेकंद एवढा वेळ सलग लाठी फिरविण्याचा जागतिक विक्रम युनिक वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाला.

या विश्वविक्रमामध्ये उलवे नोड येथील वॉरियर्स क्लबच्या सहसंचालिका ऋतुजा सागर रंधवे यांच्यासह नक्ष मयुर गावडे, जयांशु निखिल पाटील व फरहान फौजिया खलिल खान या बाल विश्वविक्रमवीरांचा समावेश आहे. या चौघांसह त्यांना प्रशिक्षित करणारे क्लबचे संचालक प्रशिक्षक ओमकार रंधवे यांचे युनिक वर्ल्ड रेकॉर्डसचे सीईओ




शबाबी मंगला, महाराष्ट्र कराटे असोसिएशनचे अध्यक्ष राजेश ठाकूर, विश्वविक्रम इव्हेंटचे आयोजक सुरेंद्र शिंदे व कविता शिंदे यांनी अभिनंदन केले.

प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री दादा इदाते यांच्या प्रमुख उपस्थितीतया दापोली येथील आझाद मैदानावर झालेल्या या कार्यक्रमास व्यासपीठावर रत्नागिरी जिल्हा लाठी स्पोर्टस् असोसिएशनचे अध्यक्ष उत्तम पाटील, नगराध्यक्ष ममता मोरे व अन्य मान्यवर, सर्व विश्वविक्रमवीर, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रायगडचे माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह हनुमान मंदिर समितीचे अध्यक्ष अवधेश महतो आणि मान्यवरांनी वॉरियर्स क्लबच्या या विश्वविक्रमवीरांचे अभिनंदन केले.

### नक्ष गावडे सर्वात लहान विश्वविक्रमवीर

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे उलवे नोड येथील ओमकार रंधवे संचलित वॉरियर्स क्लबचा प्रशिक्षणार्थी अवघ्या चार साडेचार वर्षाचा नक्ष मयूर गावडे हा या विश्वविक्रमातील सर्वात लहान वीर ठरला. त्याच्यासोबतच जयांशु निखिल पाटील हा पाच वर्षे वयोगटाचा स्पर्धक, तर वॉरियर्स क्लबच्या सहसंचालिका ऋतुजा सागर रंधवे आणि या क्लबचा आणखी एक स्पर्धक विद्यार्थी फरहान खलील खोत हे चारही स्पर्धक विश्वविक्रमवीर ठरले.

# राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत पुण्यातील खेळाडूंचा डंका

**पुणे : प्रतिनिधी**

बंगळुरू येथे झालेल्या ६२व्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील १० इनलाईन फ्री स्टाईल स्केटर खेळाडूंनी शानदार कामगिरी करताना १४ पदके जिंकली.



पुण्यातील सर्वात लहान स्केटर साची सिद्धार्थ शहा हिने मुलींच्या ९ ते ११ वयोगटात शानदार कामगिरी करताना दोन रौप्यपदकांची कमाई केली. जिनेश नानल आणि श्रेयसी जोशी यांनी दमदार कामगिरीच्या जोरावर वरिष्ठ गटात प्रत्येकी दोन सुवर्णपदके पटकावली. त्यांनी स्पीड स्लॅलम आणि क्लासिक स्लॅलम गटात ही सर्वोत्तम कामगिरी नोंदविली. भारतातील उत्कृष्ट फ्रीस्टाईल स्केटर म्हणून त्यांनी दर्जा मिळविला. स्वराली जोशी हिने स्पीड स्लॅलममध्ये सुवर्ण आणि क्लासिस स्लॅलममध्ये रौप्यपदक जिंकले. याशिवाय इतर खेळाडूंनीही पदकांवर नाव कोरले.

# नवी मुंबई मनपाचे अधिकारी, कर्मचारी रंगले खेळांमध्ये

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांनी दैनंदिन कामकाजामध्ये शारीरिक व मानसिक ताणतणावापासून मुक्त रहावे तसेच प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त अवस्थेत असलेल्या क्रीडा व कला गुणांना वाव मिळावा या दृष्टीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिका आंतरविभाग क्रीडा स्पर्धांचे तसेच वर्धापन दिनी आदी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.



यामध्ये नमुंमपा पुरुष व महिला अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता क्रिकेट, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, बुद्धीबळ, कॅरम, ॲथलेटिक्स अशा क्रीडा प्रकारांबरोबरच महिला कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी पाककला, रांगोळी, खेळ पैठणीचा अशा विविधांगी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. या स्पर्धांमध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविलेला आहे.

स्पर्धा आयोजनात क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे-पाटील, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव तसेच विजय रांजणे, अजित फाकटकर, गिरीष चावरे, अनिल रसाळ, रवी जाधव, विलास कांबळे, प्रशांत राणे, संतोष मळेकर, राम चव्हाण, अभिजीत काटकर, सुनील गावीत, संजय ठाकरे अशा विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

जीवेत् शरदः शतम्!
विलास समीनदार
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
रोशन घाग

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com